कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ४ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

### शुक्रवारपासून पावसाचा इशारा

**मुंबई :** राज्यात ५ ते ८ एप्रिलदरम्यान उत्तर महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा या भागांत पाऊस पडणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. मार्च महिन्यात उन्हाचे चटके जाणवू लागत असताना काही दिलासा मिळणार असला तरी शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. राज्यात शुक्रवारपासून (५ मार्च) अवकाळी पाऊस पडणार आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. राज्यात अवकाळी पाऊस पडणार असताना तापमानातही दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

Required Accountant
Educational qualification
B-com.
Knowledge
Ms office / Tally
Location : Panvel
For Interview
Call : 9768965959




आजचा अग्रलेख
**शिंदे गटाची हैसियत**

## पेणमध्ये तटकरेंच्या सभेची
# जोरदार चर्चा; रिकाम्या खुर्च्या

संतोष पाटील
। पेण ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांच्या नेत्यांनी सभांचा सपाटा लावला आहे. दिल्ली दरबारी आपलं वजन वापरुन खासदार सुनील तटकरे यांनी भाजपच्या नाकावर टिचून तिकीट आणले आणि जिल्ह्यात बैठका, सभा सुरु झाल्या. बुधवारी (दि. ३) पेण तालुक्यातील हमरापूर येथे महायुतीची सभा होती. या सभेसाठी हजारो कार्यकर्ते येणार असल्याचे अपेक्षित धरण्यात आले होते.



तशी आसन व्यवस्थाही करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात फक्त ४७ च्या आसपासच खुर्च्या भरल्या. पहिल्या तीन रांगा सोडून सर्व खुर्च्या रिकाम्याच होत्या. ज्या रांगा भरल्या होत्या, त्यामध्येसुद्धा आयाराम-गयारामच जास्त होते. व्यासपीठावर गर्दी अधिक, पण कार्यकर्त्यांनी पाठ फिरवल्याने सभेच्या ठिकाणी उपस्थित नेत्यांचे हसे झाले.

हमरापूर विभाग •> पान २ वर



### दोन्ही पाटील अनुपस्थित

**लोकसभेसाठी खासदारकीचे तिकीट मिळेल या आशेने पक्ष बदलून गेलेले धैर्यशील पाटील यांच्या हाती शेवटी काहीच लागले नाही. त्यामुळे ते नाराज असल्याच्या चर्चा आहेत. त्यातच आ. रवीशेठ पाटील यांना या सभेला मुद्दाम डावलल्याची चर्चा असल्याने त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांमध्ये आधीच नाराजी होती. दरम्यान, दोन्ही नेते नाराज असल्यामुळेच त्यांनी या सभेकडे पाठ फिरवल्याची चर्चा आहे. त्यामुळे कार्यकर्तेदेखील संभ्रमात पडले आहेत.**

## कमळाबाईने टोचले घड्याळाचे कान

आविष्कार देसाई
। रायगड ।

लोकसभेचा हट्ट सोडल्यानंतर भाजपा आता पूर्ण जोशात आली आहे. महायुतीचे उमेदवार म्हणून सुनील तटकरे यांना निवडून आणण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी बलिदान देण्याची तयारी केली आहे. त्यामुळे तटकरेंनी भविष्यात भाजपाला विसरु नये अन्यथा गाठ आमच्याशी आहे, अशा आविर्भावात भाजपाच्या नेत्यांसह पदाधिकाऱ्यांनी तटकरेंचे कान टोचल्याचे दिसून आले.

- **भाजपाचे बलिदान विसराल, तर खबरदार**
- **मंत्री आदिती तटकरेंच्या उपस्थितीत कार्यकर्ते आक्रमक**

अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी सभागृहात भाजपाची बुथ कार्यकर्ता, सुपर वॉरियर्स संमेलन आणि निवडणूक नियोजन बैठक पार पडली. त्यावेळी भाजपाच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी तटकरे यांना निशाण्यावर घेतल्याचे दिसून आले. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी तटकरेंच्या हेतूवर शंका उपस्थित केली. विशेष म्हणजे, यावेळी व्यासपीठावर मंत्री आदिती तटकरेदेखील उपस्थित होत्या. आतापर्यंत सुनील तटकरे यांनी बहुतांश पक्षांच्या नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना फसवले आहे. त्यामुळेच आम्हाला स्पष्ट आणि विश्वासार्ह आश्वासन पाहिजे आहे, असा सूर भाजपाच्या कार्यकर्त्यांचा असल्याचे दिसून आले.

गेल्या एक वर्षाहून अधिक कालावधीत भाजपाने •> पान २ वर

वे|ध|क

### अजित पवार गट येणार अडचणीत

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं अजित पवार गटाला चांगलंच जेरीस आणलं आहे. सत्ताधाऱ्यांविरोधात निवडणूक आयोगाकडे करण्यात आलेल्या आचारसंहिता नियम उल्लंघनाच्या तक्रारी आयोगानं स्वीकारल्या आहेत. तर, सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन न्यायालयाच्या निर्देशांचं कशाप्रकारे उल्लंघन सुरू आहे, याकरिता त्यांनी न्यायालयात पुन्हा धाव घेतली आहे. न्यायालयाच्या निर्देशांचं पालन न करणं हा न्यायालयाचा अवमान ठरतो, त्यामुळेच अजित पवार गटाच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

### भावना गवळींचा पत्ता कट

**मुंबई :** यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरण्यास अवघे काही तास शिल्लक असताना येथून महायुतीकडून राजश्री हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. गेले काही दिवस येथील उमदेवारीबाबत तिढा निर्माण झाला होता. विद्यमान खासदार भावना गवळी यांना उमेदवारी देण्यास भाजपने तीव्र विरोध केल्यानंतर उमेदवार कोण राहणार, या मुद्द्यावर राजश्री पाटील यांच्या नावाने आता पडदा पडला आहे.

### ठाकरेंचे आणखी चार शिलेदार

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात भाजप खासदार उन्मेष पाटील यांनी प्रवेश केला. या प्रवेशावेळी उद्धव ठाकरे यांनी राज्यातील आणखी ४ उमेदवारांची नावे जाहीर केली. यात हातकणंगले, पालघर, जळगावच्या उमेदवारांची नावे आहेत. जळगावमध्ये करण पवार, हातकणंगलेमधून माजी आमदार सत्यजित पाटील, तर पालघरमध्ये भारती कामडी आणि कल्याणमध्ये वैशाली दरेकर यांच्या नावांची घोषणा उद्धव ठाकरे यांच्याकडून करण्यात आली आहे.

## स्व. मीनाक्षीताईंना अभिवादन



### उरणमध्ये सर्वपक्षीय श्रद्धांजली

। उरण । प्रतिनिधी ।

शेकापच्या नेत्या माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे दीर्घ आजाराने पेझारी येथील निवासस्थानी शुक्रवारी (दि. २९) निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी उरण येथील समाज प्रबोधन शिक्षण संस्थेच्या वासुदेव बळवंत फडके सभागृहात बुधवार, दि. ३ एप्रिल रोजी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वांनी स्व. मीनाक्षी पाटील यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

या सभेचे प्रास्ताविक कामगार नेते संदीप पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी १९८४ साली शेतकरी आंदोलनात आमदार मीनाक्षीताई पाटील यांचे योगदान आणि त्यांना झालेली अटक तसेच बोकडविरा गावातील त्यांच्या आठवणी सांगितल्या. तालुका चिटणीस विकास नाईक यांनी ताईंना चिटणीस झाल्यानंतर उरणमध्ये भेटलो, •> पान २ वर

### अलिबागमध्ये आज शोकसभा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माजी अध्यक्षा, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी अलिबामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी पत्रकार संघ आणि स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंच यांच्या वतीने गुरुवारी (दि.४) एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास रामनारायण पत्रकार भवन येथे ही सभा होणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी यांनी दिली.

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना •> पान २ वर

## ज्यांच्या पाठीशी शेकाप, त्यांचा विजय निश्चित

### शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांचे उद्गार

। अलिबाग । वार्ताहर ।

ज्यांच्या पाठीशी शेतकरी कामगार पक्ष असतो, त्यांचा विजय निश्चित असतो, असे उद्गार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी अलिबागमध्ये झालेल्या आढावा बैठकीत काढले. यावेळी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ३२ रायगड लोकसभा २०२४ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलिबाग शहराच्या आढावा बैठकीचे



आयोजन अलिबाग गोविंद नगर, डॉ. फुटाणे हॉस्पिटलसमोर, चेंढरे बायपास रोड येथे दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता करण्यात आले होते. बैठकीसाठी मोठ्या संखेने शिवसैनिक उपस्थित होते.

तटकरे हे गद्दारच आहेत. पहिले अंतुलेंना फसवलं आणि आता शरद पवारांना फसवले, म्हणून शरद पवारांनीच पक्षप्रमुख उद्धवजींकडे अनंत गीते यांची उमेदवारी मागितली, जेणेकरून ही गद्दारीची घाण नष्ट करता येईल, अनंत गीतेंसारख्या सदाचारींची गरज जनतेला आहे, तटकरेंसारख्या भ्रष्टाचाऱ्यांची •> पान २ वर

## अपघातात दोघे जागीच ठार

। कोलाड । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावर मंगळवारी रात्री ११च्या सुमारास कोलाड हद्दीत कोकण रेल्वे पुलाखाली ट्रेलर चालकाने सेलेरिओ कारला धडक मारून भीषण अपघात झाला. हा अपघात एवढा गंभीर होता की, या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोलाड पोलीस ठाणे हद्दीत हा अपघात घडला. कोलाड पोलीस ठाण्याचे हनुमंत मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मंगळवार दि.२ एप्रिल रोजी रात्री ११च्या सुमारास योगेश सुधाकर गुरव, रा. वैभवनगर वरसे रोहा, परेश नामदेव खांडेकर, रा. राम



मंदिर मराठा अली अस्तमी रोहा, योगेश मनोहर पाटील, वरसे रोहा हे तिघे सेलोरियो कार क्र. एम.एच. ४७ डब्ल्यू १७६५ ने ही खांब बाजूकडून मुंबई-गोवा महामार्गाने जात होते. त्यांची कार कोलाड येथील कोकण रेल्वे पुलाखालून उजव्या बाजूला द.ग. तटकरे हायस्कूल रस्त्याने जाण्यासाठी रस्ता ओलांडत होते. दरम्यान, गोवा बाजूकडून भरधाव वेगात आलेला ट्रेलर क्र. एम.एच. ४३ बीएक्स ९५१९ चालक शेरसिंग ओम प्रकाश यादव, रा. उतर प्रदेश याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून कारला जोरदार ठोकर दिली. हा अपघात एवढा भीषण होता की, त्यामध्ये योगेश गुरव व परेशखांडेकर यांचा जागीच मृत्यू झाला. योगेश पाटील जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

याबाबत कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनास्थळी रोहाचे पोलीस उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, कोलाड सपोनि नितीन मोहिते यांनी भेट दिली. यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास एन.एल. चौधरी, एन.व्ही. गायकवाड करीत आहेत.

## आंबोली कालव्याची प्रतीक्षा संपणार
# ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार

सुधीर नाझरे
। मुरुड जंजिरा ।

तालुक्यातील खार आंबोली धरणाचे पाणी शेतीपर्यंत पोहोचू न शकल्याने अनेक वर्षांपासून भातशेतीव्यतिरिक्त अन्य पिके घेण्यास शेतकरी धजावत आहेत. २०१४ मध्ये राज्यभर जलयुक्त शिवार योजनेची अंमलबजावणी करण्यात आली; परंतु आंबोली धरणावर अवलंबून उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम सात वर्षांपासून बंद पडल्याने हजारो शेतकऱ्यांना कालव्याचे पाणी मिळालेच नाही. दरम्यान, कालव्याच कामासाठी १५ कोटींच्या निधीची निविदा काढण्यात आली असून, लवकरच काम सुरू होणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, जवळपास ६०० हेक्टर जीमन ओलिताखाली येणार आहे.

शेती उत्पन्न वाढून शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावा, हा त्यामागचा हेतू आहे. मात्र, गेल्या सात वर्षांपासून आंबोली धरणातील कालव्याचे काम लवकरच सुरु होणार आहे. नुकत्याच या १५ कोटींच्या कामाच्या •> पान २ वर

### मुरूडसह १२ गावांना पाणी

**आंबोली धरण २००९ बांधण्यात आले असून, त्यासाठी सुमारे ३० कोटी रुपये खर्च करण्यात आला. स्थानिक शेतकऱ्यांना दुबार पीक घेता यावे, त्याचबरोबरच तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी मिटावी, या उद्देशाने धरण बांधण्यात आले. मुरुडसह लगतच्या १२ गावांना धरणातून पाणी पुरवठा होतो.**

**तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता आहे.आंबोली धरण २००९ बांधण्यात आले असून, त्यासाठी सुमारे ३० कोटी रुपये खर्च करण्यात आला. पूर्वी ओपन कालवा रद्द करून मोठाले पाईप टाकून जमिनीखालून कालवा काढण्याचा प्रस्ताव निर्णय येणार आहे. त्यासाठी १५ कोटी कामाच्या निविदा निघाल्यात, लवकरच काम सुरु होणार आहे. कामाचा कालावधी एक वर्षाचा असणार आहे. कालव्याबाबत शेतकऱ्याला मोबदला मिळण्याबाबत अजून कोणताही निर्णय झाला नाही.**

**– ए.डी. रोकडे, कार्यकारी अभियंता, पेण**





## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ एप्रिल

१) श्री. श्रीरंग जगन्नाथ ढोरे
कल्याण, ४-४-१९४९
२) श्री. मुकुंद शिवराम गुंजाळ
अलिबाग, ४-४-१९४८
३) श्रीम. शैलजा विठोबा मुकादम
अलिबाग, ४-४-१९५६
४) श्री. संजय गोवर्धन बुटाला
अलिबाग, ४-४-१९६०

## रस्ता झाला चकाचक

**अलिबाग :** तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्यावरील नागाव ते चौलपर्यंतचे खड्डे पूर्णतः भरले असून, या रस्त्यावर डांबराची कार्पेट टाकण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्ता चकाचक झाल्याचे दिसून येत आहे. या रस्त्याला अनेक ठिकाणी खड्डे पडले होते. त्यामुळे वाहन चालकांसह प्रवाशांना प्रवास करणे कठीण झाले होते. याबाबत वृत्तपत्रातूनही अनेकदा आवाज उठविण्यात आला होता. दरम्यान, संबंधित विभागाने रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने आता प्रवास सुखकर झाला आहे.

# रायगडमधून भ्रष्टाचाराला हद्दपार करा

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

आज आपल्या देशातील सर्वात श्रीमंत मुकेश अंबानी यांनासुद्धा एकाच मताचा अधिकार आहे. आणि इथे बसलेल्या माझ्या सर्वसामान्य आणि कष्टकरी शेतकऱ्यांनासुद्धा एकच मत आहे. या मताची किंमत तुम्हाला कळली पाहिजे. हे एक मत या देशाचं भविष्य ठरवणार आहे. तुम्हा सर्वांच्या एक-एक मताने अनंत गीते रायगडचा खासदार होणार आहे. अनंत गीतेंसारख्या खासदारांच्या एक-एक मताने देशाचा पंतप्रधान आणि या देशाचं सरकार निवडलं जाणार आहे. एवढं महत्त्वाचं तुमचं मत आहे. त्यामुळे या निवडणुकीने भ्रष्टाचाराला रायगडमधून हद्दपार करण्याची आपण शपथ घेऊया, असं आवाहन रायगड लोकसभा मतदारासंघाचे उमेदवार अनंत गीते यांनी केलं.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीच्या विविध नेत्यांच्या उपस्थितीत श्रीवर्धनमधील रानवली येथे मंगळवार, दि.२ एप्रिल रोजी झालेल्या




- **अनंत गीतेंचे कार्यकर्त्यांना आवाहन**
- **रानवली येथील आघाडीचा जाहीर मेळावा**

जाहीर मेळाव्यात अनंत गीते यांनी उपस्थित जनसमुदायाला संबोधित केलं. याप्रसंगी शिवसेना आणि इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या देशात लोकशाही आणि संविधान टिकणार की नाही हे ठरवणारी ही निवडणूक आहे.आज दुर्दैवाने लोकशाही संकटात असून, हुकूमशाही चोरपावलांनी येते की काय? म्हणून या हुकूमशाहीला रोखण्याकरिता आणि लोकशाहीला वाचवण्याकरिता जे जे राष्ट्रभक्त आहेत, ज्याचं या देशावर प्रेम आहे, ते सगळे इंडिया आघाडीच्या रूपाने एकत्र आले आहेत .या एकत्र आलेल्या विविध पक्षांच्या माध्यमातून आपण लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे जात आहोत, असे गीत म्हणाले. रायगडचा विचार केला तर ही निवडणूक भ्रष्टाचार विरोधात सदाचाराची आहे. २०१९ च्या निवडणुकीत सुनील तटकरेंची रायगडच्या राजकारणातून हद्दपारी वाचली ती शेकापच्या जयंत पाटील यांच्यामुळे. ही हद्दपारी वाचवण्याचं काम ज्यांनी केलं होतं त्या जयंत पाटलांच्या पाठीतच त्यांनी खंजीर खुपसला. ज्यांनी त्यांना राजकीय जन्म दिला, त्या बॅरिस्टर अंतुले आणि त्यानंतर ज्यांनी त्यांना मोठं केलं त्या शरद पवारांच्या पाठीतही त्यांनी खंजीर खुपसला. राजकीय जन्म देणाऱ्या अंतुलेंचा जो झाला नाही, ज्या शरद पवारांनी त्यांना मोठं केलं त्या शरद पवारांचा जो झाला नाही, तो तुमचा काय होईल? अशा विश्वासघातकी माणसाला तुम्ही या निवडणुकीत मतदान करणार आहात का? असा सवाल अनंत गीते यांनी उपस्थितांना केला.

# 'तटकरेंचा हिशोब चक्रीवाढ व्याजासकट चुकता करेन'

**। आंबेत । वार्ताहर ।**

इंडिया आघाडीचे रायगड लोकसभेतील ठाकरे गटाचे उमेदवार अनंत गीते यांचा जनसंवाद दौऱ्याचा दुसरा दिवसदेखील विरोधकांवर तोफ डागत सुरु झाला. त्यावेळी गीतेंनी सुनील तटकरे यांचा बालेकिल्ला असलेल्या श्रीवर्धन मतदारसंघातील खामगाव येथे या निवडणुकीत पराभूत करून तटकरेंचा हिशोब चक्रीवाढ व्याजासह चुकता करेन, तसेच देवेंद्र फडणवीस यांची राजकीय भूकदेखील थांबवू, असा इशारा दिला. देशात लोकशाही वाचविण्याकरिता राज्यातील लोकसभा निवडणूक ही राजकारणाला कलाटणी देणारी असेल, राज्याची अवस्था आज बिहारप्रमाणे असून, सत्ता मिळवण्याकरिता भाजप नीच पातळी ओलांडत आहे, भाजपला बहुमत मिळवूनदेखील राज्यात भाजप फोडाफोडीचे राजकारण करतंय, त्यामुळे त्यांना हद्दपार करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने उतरलो आहोत, अशी भावना गीतेंनी यावेळी व्यक्त केली.




# ऐतिहासिक कुडा बौद्ध लेणी पर्यटकांच्या प्रतिक्षेत

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आगरदांडा-इंदापूर रस्त्यालगत असणाऱ्या कुडा गावाजवळील ऐतिहासिक कुडा बौध्द लेणी या ठिकाणी पर्यटकांच्या प्रतिक्षेत आहेत. रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक कुडा बौध्द लेणी महोबाचा डोंगरावर असून, या ठिकाणी २६ कोरीव लेण्या आहेत. सम्राट अशोक यांनी बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी लेण्यांची निर्मिती केली.

या लेण्यांची नोंद इ.स. १८४८ मध्ये सापडली असून, या लेण्या इ.स. पूर्व सहाव्या शतकात स्थापन करण्यात आलेल्या आहेत. लेणीतील २६ गुहांपैकी ५ चैत्यगृहे

(छायाचित्र : गणेश चोडणेकर)



या ठिकाणी आढळतात. २२ विहार ११ पाण्याची टाकी आणि ३२ शिलालेख आहेत. लेणी क्रमांक १,६,९,१५ आणि २१ ही चैत्यगृह आहेत. लेणी क्रमांक ६ हे सर्वात मोठे चैत्यगृह असून, इथे बुद्धांची शिल्प कोरलेली आपणास पाहायला मिळतील. धम्म चक्र प्रवर्तन मुद्रेतील भगवान बुद्धांच्या मूर्त्या दर्शनी भागातही आणि आतील विहारातील भागातही आहेत. लेणी आता समोर हत्तीच्या जोडीचे शिल्प असलेले आपणस पाहायला मिळेल. विविध प्राण्यांची शिल्पदेखील लेणी मध्ये आढळून येतात. या ऐतिहासिक कुडा बौध्द लेणी पाहण्यासाठी पर्यटकांची संख्या मोजण्याइतकी येत असल्याने पर्यटकांच्या प्रतिक्षेत आहेत.

> आगरदांडा-इंदापुर तळा मुख्य रस्त्यावरून जाताना या ठिकाणी ऐतिहासिक कुडा बौध्द लेणी आहे हे कळतच नाही. त्यामुळे या ठिकाणी पुरातत्त्व खात्याने मोठा फलक लावणे गरजेचे आहे.
> – संदेश शामा, पर्यटक

# अलिबागचे नामकरण मायनाक नगरी करावे

## विधानसभा अध्यक्ष यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरासह तालुक्याचे मायनाक नगरी असे नामकरण करण्यात यावे तसेच मायनाक भंडारी यांचे अलिबाग शहरात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशा आशयाचे पत्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत सागरी संरक्षण आणि सागरी मोहिमांना अतिशय महत्त्व आहे. महाराजांनी दूरदृष्टीने बलाढ्य आरमाराची उभारणी केली. कोकणातील भंडारी समाजाचे नेतृत्व करणारे मायनाक भंडारी या शूर लढवय्याकडे त्यांनी समुद्रमार्गे स्वराज्याला धोका उद्भवल्यास सागरी सीमेचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपवली होती. अलिबाग येथील खांदेरी-उंदेरी बंदरावरील किल्ला आणि तेथील मायनाक भंडारी यांचा पराक्रम, चिवट संघर्ष यापुढे इंग्रजांनादेखील माघार घ्यावी लागली होती. स्वराज्याचे आरमार आणि त्यासंदर्भातील इतिहास यातील मायनाक भंडारी यांच्या या पराक्रमाचा



ऐतिहासिक संदर्भ घेता हे नामकरण करावे, असेही नार्वेकर यांनी म्हटले आहे.

अखिल भारतीय भंडारी महासंघाचे अध्यक्ष नविनचंद्र बांदिवडेकर, मुख्य सचिव प्रकाश कांबळी, सहसचिव वैभव तारी आणि प्रवक्ते शशांक पाटकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची भेट घेऊन अलिबाग शहरासह तालुक्याचे मायनाक नगरी असे नामकरण करण्यात यावे तसेच मायनाक भंडारी यांचे अलिबाग शहरात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदनदेखील या शिष्टमंडळाने नार्वेकर यांना सादर केले.

सदरची मागणी अतिशय रास्त असून, त्याची शासन स्तरावरून उचित दखल घेण्यात यावी आणि नामकरण, स्मारक उभारणी याद्वारे या मागणीची पूर्तता व्हावी, अशी शिफारस विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे.

# शहरातील उघडी गटारे धोकादायक

## नगर पंचायतीचे दुर्लक्ष; गटारात पडून गायीचा मृत्यू

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा शहरातील नगर पंचायत हद्दीतील उघडी गटारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक, शाळकरी विद्यार्थी यांना दिवसेंदिवस अडचणीचे ठरत आसल्याचे सर्वत्र चित्र आहे. म्हसळा शहरासह सावर, आदिवासी वाडी, दुर्गवाडी, चिराठी, गवळवाडी, नवानगर, बेलदारवस्ती या शहराचे उपनगरातून गटारे-रस्ते यासाठी कोट्यवधी रुपयांची विकासकामे, रस्त्यालगत होणारी इमारत बांधकामे आहेत. त्यामुळे कधी रस्ता अरुंद होणे, रस्त्यालगत मातीचे ढिगारे असणे, उघडी गटारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक, शाळकरी विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत आहेत.

शहरात विकासकामे सर्वत्र आणि सर्वच भागांत शाळा आहेत, सर्वच भागातून सर्व प्रकारच्या वाहनांची असणारी वर्दळ यामुळे ह्या समस्या चिंतेचा विषय ठरत आहेत. याच कालावधीत नगर पंचायत हद्दीतील कन्या शाळेजवळील बोरकर-उमरोटकर यांच्या परिसरांतील गटारांत गाय पडून दुर्घटना झाल्याची घटना रविवार दि.२६ मार्चला सामोरे घडली.

नगरपंचायत प्रशासनाने मृत गोवंशाची विल्हेवाट कशी लावली, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची तांत्रिक मदत (पोस्ट मार्टन वगैरे) घेतली का? गोवंशाचा मालक कोण? महाराष्ट्रात दि २ मार्च २०१५ पासून गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्यात आला असताना मुख्याधिकारी राठोड यानी पोलिसात घटनेबाबत कळविले का, हे सर्वच प्रश्न अनुत्तरीत आहेत.

याबाबतची माहिती मुख्याधिकारी यांना विचारता ती देण्यास, गोवंशाचे मालकाचा शोध करण्यास मुख्याधिकारी राठोड टाळाटाळ करीत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, नगरपंचायत प्रशासनाकडून हलगर्जीपणामुळे गोवंशाचा मृत्यू होण्याचे घटनेचा तपास होणे आवश्यक आहे, अशी मागणी महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे युवा अध्यक्ष सौरभ गोरेगावकर केली आहे.

# 'तिसऱ्या मुंबई'वर हरकतींचा पाऊस

## शेतकरी देशोधडीला लागणार असल्याच्या भावना

**। हमरापूर । वार्ताहर ।**

एमएमआरडीएने घोषित केलेल्या तिसऱ्या मुंबईला (नवनगर प्रकल्पाला) पनवेल, उरण व पेण या तिन्ही तालुक्यांतील विरोध वाढला आहे. आतापर्यंत हजारांवर हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. या तिन्ही तालुक्यांत मोठा विरोध या प्रकल्पाला होत आहे.

ॲड. अच्युत पाटील, शेतकरी सामाजिक विकास संस्था पेणचे अध्यक्ष अनंत पाटील, कॉ. भूषण पाटील, सुधाकर पाटील यांनी पेण तालुक्यातील आंबिवली, बळवळी, कांदळे, उचेडे, वाशी, वढाव, बोरी, शिर्की, हमरापूर भाग आदी गावांत विभागवार बैठका घेतल्या. या प्रकल्पाचे नियोजन करीत अटल सेतूचा खर्च भरून काढण्यासाठी शासन शेतकऱ्यांच्या जमिनी बळाकावत असल्याचा आरोप केला आहे. जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या



बापाची, शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय असो, घोषणा देत शेतकऱ्यांनीही याला विरोध केला आहे.

पनवेल, उरणमधूनदेखील हजारो हरकती दाखल झाल्या आहेत. पेणमध्ये गेले दोन दिवस ७८ गावांत या प्रकल्पाला विरोध दाखवला असून, दहा हजार हरकती जमा केल्या आहेत. अजूनही या तिन्ही तालुक्यातून हरकतींत वाढ होत आहे. राज्य सरकारने एमएमआरडीएच्या माध्यमातून शिवडी व न्हावाशेवाला जोडणारा अटल सेतू विकसित केल्यानंतर तिसरी मुंबई प्रकल्प विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पनवेल, उरण व पेण तालुक्यांतील १२४ गावांमधील ३२४ चौरस किलोमीटर क्षेत्राचा विकास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. ४ मार्च रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

कर्जबाजारी झालेल्या एमएमआरडीएच्या तिजोरीत खडखडाट आहे. अटल सेतूचा खर्च वसूल करण्यासाठी पेण, उरण व पनवेलमधील १२४ गावांच्या शेतजमिनी संपादित करून शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा प्रकल्प पेणच्या शेतकरी कदापि मान्य करणार नाही, अशी प्रतिक्रिया ॲड. अच्युत पाटील, अनंत पाटील, कॉ. भूषण पाटील यांनी दिली. येथील शेतकरी आता जागरुक झाला असून, या प्रकल्पामुळे देशोधडीला लागणार असल्याची भीती वाटत आहे. त्यामुळे आतापर्यंत हजारो हरकती शेतकऱ्यांनी एमएमआरडीकडे दाखल केल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत आम्हाला हा प्रकल्प नको, अशा प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करीत आहेत.

पान १ वरून

## जोरदार चर्चा; रिकाम्या खुर्च्या

म्हटल्यानंतर आमदार रवी पाटील आणि मा. विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांचा बालेकिल्ला, त्यामुळे विक्रमी गर्दी होणार अशी राष्ट्रवादीच्या हौशा-नवशा बोलघेवड्या तालुक्याच्या पुढाऱ्यांना वाटली होती. परंतु, खास सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हमरापूर येथील सभेला आमदार रवी शेठ पाटील यांना मुद्दाम डावल्याचे समजते, त्यामुळेच अगोदरच नाराज असलेल्या कार्यकर्त्यांनी या सभेला अक्षरशः पाठ फिरवली. व्यासपीठावरचे चित्र पाहिल्यावर महायुतीची सभा आहे की, एखाद्या ग्रामपंचायत वॉर्डची सभा आहे, हेच समजत नव्हते. व्यासपीठावर सुनील तटकरे यांच्यावर स्तुतीसुमने उधळणाऱ्या बगलबच्चांव्यतिरिक्त कोणीच दिसत नव्हते. तालुका अध्यक्ष दयानंद भगत ज्यांना ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये नवख्या महेंद्र घरत यांनी पाणीपत केले, दुसरे विकास म्हात्रे ज्या पार्टीत जातील, त्या पार्टीमध्ये भकास होईल एवढे निश्चित, अशीच चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे. आजपर्यंत कोणताच असा पक्ष राहिला नाही, ज्यामध्ये त्यांनी पक्षप्रवेश केला नसेल, असे सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. तिसऱ्या म्हणजे, महिला तालुकाध्यक्ष चैत्राली पाटील, ज्यांना ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये आपल्या मुलाचे डिपॉझिट वाचवता आले नाही. त्यानंतर नरेंद्र ठाकूर ज्यांची कीर्ती पूर्ण तालुक्यामध्ये आहे. असे व्यासपीठावर दांडगा जनसंपर्क असणारे कार्यकर्ते उपस्थित होते. तर, व्यासपीठाच्या समोर पहिल्या तीन रांगा वगळता सर्व खुर्च्यांच्या रांगा रिकाम्याच रिकाम्या होत्या. आणि, ज्या काही तीन रांगा भरलेल्या होत्या, त्यामध्ये शहरातील मंडळीच जास्त दिसत होती.

**खरंच मनोमिलन झालेय?**

एकंदरीत काय तर, जरी नेते मंडळी म्हणत असतील, मिले सुर मेरा तुम्हारा, तो सुर बने हमरा; पण खरी परिस्थिती ही खूपच वेगळी आहे. कारण, हमरापूर हा विभाग भाजपचे आमदार स्वतःचे समजत असतील, तर स्वर्गीय प्रमोद पाटील यांना मानणारे लालबावट्याचे सेवक आजही लालबावटा अभिमानाने तिथे फडकवत आहेत. त्यामुळे पेण तालुक्यातही पहिल्याच सभेत त्यांनी दाखवून दिले, जनता भ्रष्टाचाऱ्यांच्या बरोबर नसून त्यांच्या विरोधात आहेत.

## ... घड्याळाचे कान

रायगड लोकसभा मतदारसंघ बांधायला घेतला आहे. रायगडची जागा आपल्यालाच लढवण्यासाठी मिळेल, असा विश्वास भाजपाला होता. मात्र, या जागेवर सुनील तटकरे यांचा हक्का होता, त्यानुसार त्यांच्याकडे सदरची जागा गेली. त्यामुळे भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी नाराज झाले होते. याच कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याचे प्रयत्न भाजपाने सुरु केले आहेत. मोदींना पुन्हा प्रधानमंत्री करण्यासाठी सुनील तटकरे यांना निवडून आणा, असे कार्यकर्त्यांवर बिंबवण्याची वेळ आता भाजपाच्या नेत्यांवर आली आहे. यासाठी त्यांनी आगामी कालावधीत रायगड लोकसभा मतदारसंघात असे कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने भाजपाचे पेणचे आमदार रवींद्र पाटील, लोकसभा अध्यक्ष सतीश धारप, सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, गीता पालरेचा, राजेश मपारा, गिरीश तुळपुळे यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा समावेश होता.

**पक्षविरहित राजकारण हवे**

बलिदान देऊन सुनील तटकरेंना निवडून आणण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते प्रयत्न करत असतील, तर सुनील तटकरे, आदिती तटकरे आणि अनिकेत तटकरे यांचे कर्तव्य आणि प्रतिबध्दता असली पाहिजे, की भाजपा कार्यकर्त्यांच्या विकासकामांना प्राधान्य दिले पाहिजे. त्यावेळी पक्षविरहीत राजकारण त्यांनी केले पाहिजे. ही तुमची जबाबदारी आहे, असे सतीश धारप यांनी मंत्री आदिती तटकरे यांना सुनावले.

**घटक पक्षाला समान न्याय**

महायुतीमधील प्रत्येक घटक पक्षाला समान न्याय सुनील तटकरे यांच्याकडून मिळेल याची मी हमी घेते, असा विश्वास आदिती तटकरे यांनी यावेळी बोलून दाखवला. महायुतीचे खासदार म्हणूनच ते काम करतील. जिल्ह्याला विकासाच्या वाटेवर नेण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या.

## ज्यांच्या पाठीशी शेकाप, त्यांचा विजय निश्चित

गरज जनतेला नाही. लोकसभा मतदारसंघाचं गणितच असं आहे; शेतकरी कामगार पक्ष ज्याचा पाठीशी आहे, त्याच पक्षाचा खासदार निवडून येतो. तसेही महाविकास आघाडीमुळे आज शेकाप, काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी असे बलाढ्य पक्ष आपल्यासोबत आहेत, त्यामुळे तटकरेंचा भुईसपाट निश्चित होणार, असे जिल्हाप्रमुखांनी भाषणात विरोधकांना खडे बोल सुनावले.

अलिबाग शहर प्रमुख संदीप पालकर यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला, तर अनेक शिवसैनिकांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, जिल्हा सल्लागार सतीश पाटील, युवा जिल्हाध्यक्ष अमिर ठाकूर, तालुका प्रमुख शंकर गुरव, उपजिल्हा संघटक अजित पाटील, विधानसभा संघटक कृष्णा कडवे, अलिबाग प्रवक्ते धनंजय गुरव, तालुका संघटिका स्नेहल देवळेकर, विधानसभा संघटिका तनुजा पेरेकर व पदाधिकारी उपस्थित होते.

## अलिबागमध्ये आज शोकसभा

तळागाळातील प्रश्न मार्गी लावण्याचा कायमच प्रयत्न केला. तसेच पत्रकार म्हणूनदेखील त्यांनी काम केले आहे. पत्रकारांच्या हक्कासाठी कायमच त्यांनी लढा दिला आहे. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षा म्हणून मीनाक्षी पाटील यांनी १५ वर्षे जिल्ह्यातील पत्रकारांचे खंबीरपणे नेतृत्व केले. त्यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला.

मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवार (दि. २९) मार्च रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याबरोबरच त्यांनी केलेल्या कार्याची माहिती तळागाळातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी श्रद्धांजलीपर अलिबागमध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोकसभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी यांनी केले आहे.

## ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार

निविदा काढण्यात आल्याने परिसरातील शेतकरी खुश आहे.

कालव्याचे पाणी मिळाल्यास तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता आहे. आंबोली धरणाचे लघुपाटबंधारे शेतकऱ्यांना पूरक व्यवसायाची प्रकल्पांतर्गत उजव्या-डाव्या तीर कालव्याचे काम जून २०१५ पासून बंद आहे. धरणाची पाणी साठवणूक क्षमता मोठी आहे. कालव्याचे काम पूर्ण झाल्यास बागायती, दुग्ध व्यवसाय व कृषी पर्यटनाला चालना मिळेल. शेतकऱ्यांना पूरक व्यवसायाची संधी मिळेल आणि तालुक्याचा सरासरी आर्थिक स्तर उंचावेल, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

**जमीन ओलिताखाली येणार**

आंबोली धरण उजव्या तीर कालव्याचे काम १० कि.मी. प्रस्तावित आहे. सद्यःस्थितीत ६.१ कि.मी. काम अपूर्ण आहे. तर, डाव्या तीर कालव्याचे २.६४ कि.मी. प्रस्तावित असून, १.६४ कि.मी. काम सात वर्षांपासून रखडले आहे. तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता आहे. परंतु, १५ कोटींची कालव्याची निविदा आहे, त्यात बंदिस्त कालवा करण्याचे ठरले असून, शेतीच्या खालून पाईप जाणार असल्याने शेतकऱ्याला जमिनीचा वापर शेतीसाठी करता येणार आहे. परंतु, कालव्यात पाईप टाकण्याचा मोबदला शेतकऱ्याला मिळणार नसल्याचे समजते. त्यामुळे प्रत्यक्ष काम सुरु होताना शेतकऱ्यांचा विरोध होण्याची शक्यता आहे.

**दुबार पीक घेता येत नसल्याने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. आंबोली धरणातील एकूण साठ्यापैकी १५ ते २० टक्के पाणी पिण्यासाठी वापरले जाते. डावा तीर कालवा तेलवडे गावापर्यंत अपेक्षित असून, उजवा तीर कालवा खोकरीपर्यंत गेल्यास शेतात दुबार पीक घेता येईल. ओपन कालवा रद्द करून मोठाले पाईप टाकून जमिनीखालून कालवा काढण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी समाधानी आहेत. परंतु, कालव्याच्या जमीनधारकाला योग्य तो मोबदला मिळावा, अशी शेतकऱ्याची मागणी आहे.**

**- मनोज कमाने, स्थानिक शेतकरी**

## स्व. मीनाक्षीताईंना अभिवादन

त्यावेळी त्यांनी मला चांगले काम कर, असे सांगितले. कामगार नेते मेघनाथ तांडेल यांनी ताईंच्या कार्याचा गौरव करून कामे करण्याची पद्धती कशी होती, तसेच प्रशासनावर वचक कसा ठेवायचा याबद्दलचे किस्से सांगितले. ज्येष्ठ नेते काका पाटील यांनी ताईंबद्दल जिव्हाळ्याचे संबंध होते असे नमूद केले. कॉम्रेड भूषण पाटील यांनी त्यांच्या आठवणी जागवल्या. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पंचायत समितीचे सदस्य महेश म्हात्रे यांनी केगावमध्ये पाणीसमस्या दूर करण्याचे काम तसेच रस्त्यांची काम आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्या माध्यमातून झाल्याचे सांगितले. महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमाताई यांनी डोंगरी गावातून पाणीसमस्या दूर करण्याचे काम मीनाक्षीताई पाटील यांनी केल्याचे सांगितले. शहर चिटणीस शेखर पाटील यांनी आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्या कार्याचा जीवनपटाचा आलेख व विधानसभेत मांडलेले विविध प्रश्न, विकासकामांचा उल्लेख केला. माजी जि.प. सदस्या मीनाक्षी तांडेल यांनी ताईंच्या घरी कधी गेलो तर भेटवस्तू दिल्याशिवाय त्या परत जाऊ देत नसत. यावेळी त्यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. माजी सरपंच रमाकांत म्हात्रे यांनीदेखील पेझारीला गेल्यानंतर ताई जेवण केल्याशिवाय परत जाऊ देत नसत, असे सांगितले.

जनवादी महिला संघटनेचे अध्यक्ष हेमलता पाटील यांनी आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्यासोबत निवडणूक काम केल्याचे व त्यांच्या स्वभावाबद्दल सांगितले. यावेळी कॉम्रेड मधुसूदन म्हात्रे, सत्यवान ठाकूर, ॲड. विजय पाटील, रमेश ठाकूर आदींनी आपली मनोगत व्यक्त केली. यावेळी माजी सभापती नरेश घरत, उपसभापती महादेव बंडा, सहचिटणीस यशवंत ठाकूर, युवक अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, रमाकांत पाटील, जीवन पाटील, नयन म्हात्रे, शहराध्यक्ष नयना पाटील, किशोर ठाकूर, मु.ग. पाटील, मनोहर पाटील, किशोर घरत, किरण घरत, शंकर भोईर आदी सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मीनाक्षीताईंना अखेरचा सलाम करताना 'मीनाक्षीताई अमर रहे, मीनाक्षीताईंना लाल सलाम, लाल सलाम' अशा घोषणांनी सभागृह दुमदुमून गेला.

## शिंदे गटावर नामुष्की

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या हिंगोलीचा जाहीर उमेदवार बदलण्याची नामुष्की शिवसेनेवर (शिंदे गट) आली आहे. हेमंत पाटील यांच्याऐवजी बाबुराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हेमंत पाटील यांच्या नावाला स्थानिक विरोध असल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेनेची पहिली यादी जाहीर झाली होती. या यादीमध्ये विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी घोषित करण्यात आली होती. मात्र, भाजपचा दबाव होता. त्यामुळे हिंगोलीचा जाहीर उमेदवार बदलण्याची नामुष्की शिंदे गटावर आल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. अधिकृत कोणतीही घोषणा न करता एकनाथ शिंदेंची शिवसेना एबी फॉर्म देण्याचं काम करत आहे. हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र भाजने केलेल्या सर्व्हेनुसार हेमंत पाटील यांच्या नावाला विरोध होता. भाजप देखील उमेदवार बदलण्यासाठी आग्रही होते.

## ज्योती मेटेंना बीडमधून उमेदवारी?

**मुंबई :** शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे या बीड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी बुधवारी शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी आपल्या उमेदवारीबाबत काही स्पष्टपणे सांगितलं नाही. पण, लवकर याबाबत अंतिम निर्णय जाहीर होईल असं सूचकपणे म्हटलं आहे. त्यामुळं ज्योती मेटेंची बीडमधून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. ज्योती मेटे म्हणाल्या, सक्रीय राजकारणात पाऊल ठेवणार असल्यानं मी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला आहे. त्यासाठी शरद पवारांची भेट घेतली. या भेटीत माझ्या राजकारणात सक्रीय होण्याबाबत प्रामुख्यानं चर्चा झाली.

# राजकीय नेत्यांनी घेतली पाटील कुटुंबियांची भेट









। अलिबाग । प्रतिनिधी ।

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी निधन झाले. गेल्या सहा दिवसांपासून राजकीय, सामाजिक आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून पाटील कुटूंबियांचे सांत्वन करण्यात आले. बुधवारी (दि.०३) केंद्रीय मंत्री कपिल पाटील काँग्रेसचे नेते, कामगार नेते भाई जगताप यांच्यासह अनेक मान्यवरांनी पेझारी येथे जाऊन शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील भेट घेऊन त्यांची विचारपूस करून सांत्वन केले.

मीनाक्षी पाटील यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रात एक वेगळी पकड निर्माण केली होती. रायगडसह संपूर्ण राज्यात त्यांचा एक वेगळा दबदबा राहिला आहे. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच केंद्रीय मंत्री कपिल पाटील, कामगार नेते भाई जगताप, आ. अशिष शेलार, आ. मंदा म्हात्रे, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, आ. सतेज उर्फ बंटी पाटील, महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, विकास गोगावले, जिल्हा परिषद माजी शिक्षण सभापती नरेश पाटील, सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, काँग्रेसचे नेते उमेश ठाकूर, सांगोल्यातील शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, सभासद, पंचक्रोशीतील कार्यकर्ते व ग्रामस्थांनी पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती तथा मीनाक्षी पाटील यांच्या स्नुषा चित्रा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, सुमन पाटील, आदी मान्यवरांसह शेकापचे पदाधिकारी, चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत केंद्र प्रमुख, साधनव्यक्तींना मार्गदर्शन

# शिक्षक करणार मतदानाचा जागर

प्रमोद जाधव

। अलिबाग ।



- गावागावात करणार पथनाट्य
- मतदान करण्याचा देणार संदेश

रायगड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन कामाला लागले आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने वेगवेगळ्या उपक्रमांतून मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. स्वीप उपक्रमांतर्गत गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत केंद्र प्रमुख साधन व्यक्तींना मार्गदर्शन केले जात आहे. मतदानाच्या माध्यमातून देशाची लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

रायगड लोकसभा मतदार संघात रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, श्रीवर्धन, महाड या चार विधानसभा तसेच गुहागर दापोली या रत्नागिरीतील दोन विधानसभांचा समावेश आहे. या मतदार संघात १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यामध्ये पुरुष आठ लाख १३ हजार ५१५, महिला आठ लाख ४० हजार ४१६, तृतीय पंथी चार, दिव्यांग आठ हजार ४६, ८५ वयोगटापेक्षा ३१ हजार २८ तर १८ ते १९ वयोगटातील १६ हजार २८८ मतदारांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १९ एप्रिल असून अर्जाची छाननी २० एप्रिल रोजी केली जाणार आहे. अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया २२ एप्रिल रोजी असणार आहे.रायगड लोकसभा मतदार संघात दोन हजार १८५ मतदान केंद्र आहेत. त्यात सहा संवेदनशील मतदान केंद्र आहेत. मतदान सात मे रोजी होणार असून मतमोजणी चार जूनला होणार आहे.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सर्व शासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख, विषय साधनव्यक्ती, शिक्षण साधन व्यक्ती यांची स्वीप उपक्रमांतर्गत बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम गट शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत करण्यात आले आहे. अलिबागमधील गट शिक्षणाधिकारी यांनी केंद्र प्रमुख व साधन व्यक्ती, शिक्षण साधन व्यक्ती यांची पंचायत समितीच्या कार्यालयात बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन केले.

त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या मार्फत मतदारामध्ये मतदान करण्यासाठी जनजागृतीपर विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. त्यामध्ये रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व, निबंध स्पर्धा, रॅली काढणे, पथनाट्य घेण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. मतदारांनी मतदान करून राष्ट्रीय हक्क बजावणे, मतदानाच्या माध्यमातून देशाची लोकशाही बळकट करणे. शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदारांना, आपल्या पालकांना मतदान करण्यास सांगावे, गावातील सर्व मतदारांनी मतदान करावे. वृद्ध असो की तरुण मतदारांनी मतदान करावे. मतदान करून मतदानाचे करा दान अशा प्रकारचा संदेश देखील मतदारांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात असे सांगण्यात आले.

# बांधकाम साहित्य चोरट्यांना अटक



। नेरळ । प्रतिनिधी ।

आरडे येथील बांधकाम साईटवरून साधारण एक लाखाच्या किमतीचे बांधकाम साहित्य चोरट्यांचा तपास लावण्यात नेरळ पोलिसांना यश आले आहे. चोरी करणाऱ्या तीन चोरट्यांना मुद्देमालसह ताब्यात घेतले आहे. फारूख नुर मोहम्मद शहा, सलमान आयात उल्ला शहा आणि शहजाद अब्दुल सलाम भट यांना अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

आरडे येथे यशवंत देसले यांच्या बांधकाम साईटवरून सुमारे ५२ लोखंडी सेट्रींगच्या प्लेट असा सुमारे १,०४,००० रूपये किंमतीचा माल चोरीला गेला होता.त्याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करून तपास सुरू करण्यात आला होता.

# खारघरमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा

। पनवेल । वार्ताहर ।

- सिडकोच्या धोरणावर नागरिक संतप्त
- पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मध्ये गेल्या १५ दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे सिडकोने परस्पर पाणी कपात केली आहे का?,असा प्रश्न खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ भाग उंच इमारतीचा परिसर म्हणून परिचित आहे. त्यामुळे खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील हौसिंग सोसायटींमध्ये अनेक कुटुंब वास्तव्य करीत आहेत. गेल्या १५ दिवसांपासून खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील साई हरिद्रा, कृष्णा मॅजेस्टी, स्मित, केशव रेसिडेन्सी, इनोव्हेटिव्ह कॉर्नर, कृष्णा मॅजेस्टी, गॅलेक्सी, साई सॉलिटर आदी अनेक हौसिंग सोसायटींमध्ये कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यामुळे खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील नागरिकांना टँकरमधील पाध्यावर तहान भागविण्याची वेळ आली आहे. सिडकोच्या हेटवणे धरणात मुबलक पाणीसाठा असताना खारघर सेक्टर- ३४ आणि सेक्टर-३५ मध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

दरम्यान, याबाबत सिडकोच्या पाणी पुरवठा विभागात विचारणा केली असता, मागील आठवड्यात नवी मुंबई महापालिकेने जलवाहिनीच्या कामासाठी शटडाऊन घेतले होते. त्यानंतर कमी दाबाने पाणीपुरवठा झाल्याममुळे खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा झाला होता. दरम्यान लवकरच खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मध्ये पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणे सुरळीत होणार आहे, असे सिडकोच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

## मतदार जनजागृती कार्यक्रम

। पाली । वार्ताहर ।

पेण विधानसभा मतदारसंघामध्ये सहायक निवडणूक अधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांच्या निर्देशानुसार जयकिसान विद्यामंदीर व ज्युनिअर कॉलेज, वडखळ येथील शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यासोबत विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीबाबत माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना संकल्प पत्र वाटप करण्यात आले. सदर संकल्प पत्र विद्यार्थ्यांनी आपले पालक व इतर नातेवाईकांना वाचून दाखवून त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करण्याचे आवाहन करण्यात आले.

# उल्हास नदीमधील बेकायदा बांधकाम थांबविले

## नोटीस बजावून केली कारवाई



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत कोंडीवडे रस्त्याच्या बाजूने वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पात्रात बांधकाम केले जात आहे. त्या बांधकामामुळे पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होणार आहे. त्याविरुद्ध आता प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून तेथील सर्व बांधकाम थांबविण्यात आले आहे. सर्व बांधकाम तत्काळ थांबविण्यात यावे अशी नोटीस पाटबंधारे विभाग यांच्याकडून देण्यात आली असून संबंधित बांधकाम तोडण्यात येईपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवण्याचा तक्रारदार यांच्याकडून निर्धार व्यक्त केला आहे.

तमनाथ आणि आडिवली येथे उल्हास नदीपात्रात सर्व्हे नं २९/१ मध्ये गेले अनेक दिवस मोठया प्रमाणात भराव आणि काँक्रिटची भिंत बांधकाम बेकायदेशीररित्या बांधण्यात येत आहे.त्या भिंतीमुळे पावसाळ्यात नदीचे पाणी समोरच्या गावांमध्ये घुसून नुकसान होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. हे बांधकाम पूरनियंत्रण रेषेत सर्व नियमांचे उल्लंघन करून नदीचा प्रवाह बदलत आहे.पूर्वी १५० मिटर लांबीचा असलेला हा प्रवाह आता भिंत बांधल्याने अर्ध्यावर येवून ठेपला आहे.त्याचा परिणाम पावसाळ्यात महापुराचा फटका आजूबाजूच्या ५ ते ६ गावांना बसून नदीचे पाणी घुसून शेतीची तसेच वित्तीय आणि जीवितहानी होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी वर्तवली आहे. भिंतीमुळे संभाव्य भीती लक्षात घेवून स्थानिक गावकरी शेतकरी संबधित विभागात तक्रार करून न्यायासाठी धाव घेतली होती.

मात्र अनधिकृत बांधकामास राजकीय वरदहस्त असल्याने तहसीलदार आणि जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी गुणटूरकर यांच्याकडून पूरनियंत्रण रेषेत असून कोणतीही परवानगी दिलेली नाही.मात्र विना परवाना बांधकाम करण्यात आल्याने ते बांधकाम तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.तसे पत्र आणि नोटीस जमीन मालक यांना देण्यात आली आहे. संबंधित मालक यांच्यावर कारवाई आणि नदी पत्रात अनधिकृत झालेला भराव, बांधकाम त्वरित काढून टाकण्यासाठी कर्जत प्रेस असोसिएशनने देखील साखळी उपोषण करण्याची परवानगी मागितली असून बांधकाम आणि मातीचा भराव हटवण्याची मागणी कायम ठेवली आहे.

## सहज सेवा फाऊंडेशनचा उपक्रम; सामुदायिक विवाह सोहळा संपन्न

# खोपोलीत ६० जोडप्यांचा मतदानाचा संकल्प

। खोपोली । वार्ताहर ।




सहज सेवा फाऊंडेशनच्या वतीने ६० जोडप्याचा सामुदायिक विवाह सोहळा श्रीराम मंगल कार्यालय,खोपोली येथे आयोजित करण्यात आला. याचवेळी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या सूचनेप्रमाणे या लग्न सोहळ्यात सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा हे सांगण्यासाठी जनजागृती करण्यात आली. यामुळे आदिवासी व अन्य विविध समाजातील ६० जोडप्यांनी लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचा संकल्प सोडला.

या विवाह सोहळ्यातील नव वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी महाराष्ट्रातील सहज सेवा फाऊंडेशनचे पदाधिकारी व रायगड जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व जोडप्यांना कन्यादान रुपात संसार उपयोगी साहित्य मान्यवरांच्या हस्ते भेट देण्यात आल्या.लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे बाळाराम म्हात्रे यांनी प्रमूख पाहुणे म्हणून संबोधित करताना सांगितले की, सामुदायिक विवाह सोहळ्याची समाजाला गरज आहे. समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढे यायला हवे असा आशावाद व्यक्त केला. सर्व मान्यवरांनी सहज सेवा फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले.सहज सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून २०० पेक्षा अधिक जोडप्याचा विवाह संपन्न झालेला आहे. पुढील वर्षी सुद्धा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येईल असे प्रतिपादन सहज सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधुरी गुजराथी, इशीका शेलार, सचिव अखिलेश पाटील, नम्रता परदेशी, संतोष गायकर, बनिता साह ,निलम पाटील, जयश्री कुलकर्णी, मोहन केदार, मार्गदर्शक राजेंद्र फक्के, सल्लागार नरेंद्र हर्डीकर, गणेश राक्षे, दिवेश राठोड, उबेद पटेल, अशोक ठकेकर, तुषार अगरवाल, आश्पाक लोगडे, प्रसन्न त्रिभूवन, सुमन शर्मा, नकुल देशमुख, सागरिका जांभळे, दमण सिंघ, रितेश मयेकर, चंद्रप्रकाश उपाध्याय, राजेश धोत्रे, शिवा शिवचरण, राहुल ओव्हाळ, योगिता जांभळे, रेखा भालेराव, निहारिका जांभळे आदी पदाधिकाऱ्यांनी अथक मेहनत घेतली.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली नागोठणे विभागातील मतदान केंद्रांची पाहणी

। नागोठणे । वार्ताहर ।



आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नागोठणे विभागातील विविध मतदान केंद्रांची पाहणी केली. नागोठणे विभागातील पिगोंडे, आंबेघर, वेलशेत, कडसुरे व वणी येथील राजिप शाळांमध्ये असलेल्या मतदान केंद्राची जिल्हाधिकारी यांनी पाहणी करुन तेथील सर्व सोयी-सुविधा, इतर व्यवस्था याबाबतीत मतदान केंद्रांचा आढावा घेत संबधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.

आगामी लोकसभा निवडणुका संपुर्ण जिल्ह्यात शांततेत व कायदा व सुव्यवस्थेचे पालन करुन तसेच भयमुक्त वातावरणात पार पाडाव्यात व मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे संपूर्ण जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या मतदान केंद्रांची पाहणी करीत आहेत. याद्वारे जिल्हाधिकारी मतदान केंद्रातील विविध सोयी-सुविधा, पाणीपुरवठा व इतर व्यवस्था चोख आहेत की, नाहीत याचा आढावा घेत आहेत. नागोठणे विभागातील मतदान केंद्रांचा पाहणी दौरा हा त्याचाच एक भाग असून नागोठणे विभागातील या मतदान पाहणी दौऱ्यात मतदान केंद्रातील सुरक्षितता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे शुध्द पाण्याची व्यवस्था व परिसराची स्वच्छता याविषयी समाधान व्यक्त केले.

# शिंदे गटाची हैसियत

२०१४ च्या निवडणुकीत सेना व भाजप वेगवेगळे लढले. नंतर सेना भाजपला सोडून जाईल कुठे असा माज भाजप नेत्यांनी दाखवण्यास सुरूवात केली. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेससोबत जाऊन तो एका फटक्यात उतरवला. मात्र नंतर केंद्रातल्या सत्तेच्या आधारे भाजपने त्याचा सूड घेतला. यात एकनाथ शिंदे यांनी माघारी जाऊन आपण मोठा पराक्रम केल्याचा आव आणला. त्यांना मुख्यमंत्रिपद मिळाल्याने त्यांचे कारस्थान यशस्वीही झाले. मात्र असंगाशी संग म्हणजे प्राणाशी गाठ अशी जुनी म्हण आहे. त्या रीतीने इतके दिवस सत्तेचे घी खाणारे शिंदे आणि त्यांची मित्रमंडळी आता भाजपच्या बडग्यामुळे हवालदिल झाले आहेत. लोकसभा निवडणुकींच्या जागावाटपाची त्रांगडे होऊन बसले आहे. मोंगलाविरुध्द एकेक किल्ला लढवावा त्याप्रमाणे शिंदे आणि मंडळींना एकेक जागा लढवावी लागत आहे. विशेषतः पालघर, ठाण्यातील दोन आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गच्या जागांवरून जी झुंज द्यावी लागत आहे ती पाहून महायुती नावाच्या समीकरणात आपली हैसियत किंवा लायकी काय आहे याचा प्रत्यय एकनाथ शिंदे यांना आला असेल.कल्याणमधून मुख्यमंत्र्यांच्या चिरंजीवांना बाहेर काढायचे मनसुबे गेल्या दोन वर्षांपासून भाजपवाले बाळगून आहेत. रवीन्द्र चव्हाणांनी डोंबिवली व कल्याणमध्ये भाजपचे मेळावे घेऊन शिंदे सेनेच्या विरोधात त्यासाठी मोर्चेबांधणी केली होती. आता कल्याण देणार नसाल तर ठाणे द्या असा पेच एकनाथ शिंदे यांच्यासमोर टाकण्यात आला. शिंदे यांना मोदी व अमित शाह यांच्यासोबतच्या आपल्या थेट संपर्काचे भयंकर अप्रूप होते. पण सेनेच्या विरोधात वापरून घेण्यापुरतेच ते संबंध आहेत हे आता त्यांच्या लक्षात आले असेल. या वाटाघाटींमध्ये भाजपची सर्वेक्षणे फार चर्चेत आहेत. ही जागा तुमच्या पक्षाला किंवा अमुक उमेदवाराला जिंकता येणे कठीण आहे असे आमचा सर्वे सांगतो असे भाजप नेते थेट शिंदे व अजितदादांना गेले काही दिवस सांगत आहेत.

### सर्वेक्षणांचा बागुलबुवा

हे सर्वेक्षण कोणी, कसे व कधी केले याचे तपशील ठाऊक नाहीत. मात्र प्रत्येक मतदारसंघातील भाजप व संघाच्या कार्यकर्त्यांकडून अहवाल मागवून घेऊन हा अहवाल तयार झाला आहे असा बागुलबुवा उभा करण्यात आला आहे. खुद्द भाजपमध्येही याच अहवालांच्या आधारे काही जुन्या उमेदवारांची तिकिटे कापण्यात आली आहेत. त्यामुळे शिंदे व दादांची बोलती बंद होत असावी. मात्र या सर्वेक्षणांच्या आधारे तिकिटे दिलेले आता हमखास निवडून येतील याची गॅरंटी खरी आहे की मोदींसारखी वरवरची असा प्रश्न त्यांनी भाजप नेत्यांना विचारायला हवा. अर्थात, हे दोन्ही नेते भाजपचे इतके ओशाळे आहेत की असे काही विचारण्याची कल्पनाही ते करू शकत नाहीत. रत्नागिरी-सिंधुदुर्गातही हीच स्थिती आहे. तेथे भाजपने नारायण राणे यांचे राज्यसभेचे तिकिट कापले आहे. म्हणजे आता ते जर लोकसभा लढले नाहीत तर त्यांचे मंत्रिपदही जाणार हे नक्की. १९९१ पासून ही जागा शिवसेनेकडे आहे. शिंदे फुटून बाहेर गेल्यानंतर राज्यातील बहुसंख्य भागातील नेत्यांनी पक्ष सोडला. पण सिंधुदुर्गातले कार्यकर्ते मात्र हलले नाहीत. ही जागा जिंकली तर ठाकरे गटाचा मुंबई पालिकेतला दावाही अधिक भक्कम होईल. कारण, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि मुंबईचे मानस एकच आहे. दोन्हीकडचा सामान्य सैनिक व मतदार ठाकरे यांच्यासोबतच आहे हे या लोकसभेवरून स्पष्ट होईल. शिंदे यांना त्याचीच भीती वाटते आहे. उद्या नाशिकची जागा राष्ट्रवादीच्या छगन भुजबळांना सोडावी लागली आणि हिंगोली व वाशीममधील उमेदवार भाजपने सांगितल्यानुसार बदलावे लागले तर तोंड दाखवायलाही जागा राहणार नाही. लोकसभेला ही स्थिती तर विधानसभेला तर भाजपवाले यांची काय हालत करतील हे दिसते आहेच. शिंदे यांची दिल्ली दरबारातील किंमत काय आहे हे खालच्या नेत्यांना कळून चुकले असेल. त्यामुळे इथे राहण्यापेक्षा आपणच भाजपमध्ये जावे किंवा ठाकरे गटात परत जावे असा विचार सुरू झाल्यास नवल नाही.

### भाजपची बनियागिरी

धंद्यापुढे ना आई, ना बाप, ना भाऊ असं बनियाचं तत्व असतं. पैसा, फायदा आणि स्वतःच्या स्वार्थापुढे सर्व काही झूठ असते. भाजप हा एकेकाळी बनियांचा पक्ष म्हणून ओळखला जात असे. आता तो समाजाच्या सर्व थरात पसरला आहे. मात्र त्याची मूळ बनिया वृत्ती गेलेली नाही, उलट अधिकाधिक तीव्र होत चालली आहे. भाजपने आजवर विविध राज्यांमधल्या अनेक छोट्या पक्षांसोबत युती केली. नंतर त्यातल्या बहुतांश पक्षांना त्याने फेकून दिले वा वाऱ्यावर सोडले किंवा थेट नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पंजाबात अकाली दलासोबत जनसंघाच्या काळापासून युती होती. पण शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने ती तुटली. यंदाही भाजप पंजाबात एकटा लढणार आहे. या युतीमुळे अकाली दलाचा कोणताही लाभ झाला नाही. उलट नुकसानच झाले. तीच स्थिती ओरिसात बिजू जनता दलाची आहे. २००९ पर्यंत या पक्षासोबत भाजपची प्रदीर्घ युती होती. पण तिथे आपली डाळ शिजत नाही हे लक्षात आल्यावर भाजप वेगळा झाला. मधल्या काळात नवीन पटनाईक यांनी राज्यावर आपली पकड कायम ठेवली आहे व केंद्रात भाजपला सर्व महत्वाच्या धोरणांबाबत पाठिंबाही दिली आहे. तरीही भाजपने बिजू जनता दल फोडण्याचा सपाटा लावला आहे. कटक येथील सहा वेळचे खासदार भर्तृहरी माहताब यांना भाजपने आता उमेदवारी दिली आहे. इतर राज्यात भाजपचे हे कामापुरता मामा धोरण सर्वांनाच ठळकपणे दिसले आहे. महाराष्ट्रात शिवसेनेला याचा जळजळीत प्रत्यय आला आहे. १९९० च्या दशकात प्रमोद महाजन हयात असताना महाराष्ट्रात भाजप लहान भाऊ तर शिवसेना मोठा भाऊ असे म्हटले जात असे. मात्र त्याच वेळी दुसरीकडे भाऊसाहेब फुंडकर अध्यक्ष असताना त्यांनी शत प्रतिशत भाजपचा नारा दिला होता. शिवसेना त्याबाबत गाफील राहिली व त्याची शिक्षा ती आजतागायत भोगते आहे. पूर्वी ठाकरे, आता शिंदे.

विचार

# गुंतवणूकविश्वात रुजतेय कृत्रिम प्रज्ञा

**तंत्रज्ञानाधारित वित्तीय कंपन्यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता यंत्रणेशी जोडलेले रोबो सल्लागार आता बऱ्यापैकी रुळले आहेत. या माध्यमातून संशोधन आणि संख्यात्मक विश्लेषणाद्वारे पुढे आलेला सल्ला खात्रीशीर असल्याने गुंतवणुकीबाबत निर्णय घेताना कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरते. यांत्रिक प्रणालीला गुंतवणूकदाराची जोखीम घेण्याची क्षमता, गुंतवणूक मूल्य, कालावधीची माहिती देऊन पर्याय सुचवले जातात. या प्रकारे गुंतवणूकविश्वात कृत्रिम प्रज्ञा रुजत आहे.**

**हेमंत देसाई**

शेअर बाजारात सध्या अनेक कंपन्या आयपीओच्या माध्यमातून सूचीबद्ध होत आहेत. आयपीओमध्ये मेन किंवा मुख्य बोर्ड आणि एसएमई विभागाचा समावेश असतो. एसएमई म्हणजेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विभागातील कंपन्यांच्या किंमतीमध्ये गडबडी होत असल्याचे सेबीच्या लक्षात आले आहे. ठोस पुरावे मिळाले की त्यानुसार सेबी कारवाई करणार आहे. तसेच एसएमई कंपन्यांच्या आयपीओबाबत अधिक कठोर निकष लागू केले जाणार आहेत, अशी माहिती सेबीच्या अध्यक्ष श्रीमती माधवी पुरी बुच यांनी दिली आहे. १ मार्च २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या एक वर्षात बेंचमार्क सेन्सेक्समध्ये २२ टक्क्यांची वाढ झाली. परंतु बीएससी मिडकॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांकात अनुक्रमे ६३ टक्के आणि ६५ टक्क्यांची, म्हणजे तिपटीने वाढ झाली तर बीएससी एसएमई आयपीओ निर्देशांकात १४१ टक्क्यांची वृद्धी झाली. शेअर बाजारात ज्या गतीने वाढ होत आहे, त्याच्या आसपास गतीने हे इतर निर्देशांक वाढले असते तर नैसर्गिक म्हणता आले असते. परंतु ही मिडकॅप आणि एसएमईजमधील तेजी अनैसर्गिक म्हणावी लागेल. शेअर बाजारात ज्या कंपन्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत जास्त प्रमाणात भाव असतो, तिथे धोका दडलेला असू शकतो. याचे कारण बाजाराची पडझड होते तेव्हा अशा कंपन्यांची घसरण त्यापेक्षाही अधिक पटींनी होते आणि गुंतवणूकदार अशा वेळी संकटात सापडतात.



शेअर बाजारात अनेकदा कंपन्या दलालांच्या आणि वित्तसंस्थांच्या मदतीने भावांमध्ये कृत्रिम पद्धतीने वाढ आणि घट घडवून आणतात, हा इतिहास आहे. एका मर्यादेपलीकडे भाव वाढतात किंवा घसरतात, तेव्हा सर्किट लावले जाते. परंतु भावांमधील संशयास्पद गडबड गोंधळावर बारकाईने लक्ष ठेवणे,हे सेबीचे कर्तव्य आहे.

आयपीओ असो अथवा बाजारात आधीच सूचीबद्ध झालेला शेअर असो, त्याच्या भावामध्ये कशा पद्धतीने चढ-उतार होत आहे, हा पॅटर्न काही दिवस अभ्यासून सेबी पुरावे गोळा करते. त्या पुराव्याच्या आधारावर केस तयार करून कारवाई केली जाते. काही एसएमईजच्या कंपन्या सूचीबद्ध होताना मॅनिप्युलेशन झाल्याच्या तक्रारी सेबीकडे आल्या आहेत. छोट्या कंपन्यांच्या भावांमध्ये कृत्रिमपणे हेराफेरी करणे अधिक सोपे असते. कारण या कंपन्या लहान असतात आणि त्यांचे मार्केटही चिमुकलेच असते. फ्लोटिंग स्टॉक थोडा असतो. २०२३ मध्ये १८२ एसएमई कंपन्यांचे आयपीओ आले. त्यामधून ४,६०० कोटी रुपयांचे भांडवल उभारण्यात आले. २०२२ पेक्षा हे प्रमाण १५० टक्क्यांनी अधिक होते. २०२४ मध्ये पहिल्या दोन महिन्यांमध्येच ३० एसएमई कंपन्यांचे आयपीओज आले आणि एक हजार कोटी रुपये भांडवलाची उभारणी केली. बाजारमूल्य ५,००० कोटी रुपयांपेक्षा कमी असणाऱ्या कंपन्या स्मॉल कॅप आणि पाच हजार ते २० हजार कोटी रुपयांच्या कक्षेत असणाऱ्या कंपन्या मिडकॅप मानल्या जातात. ऑगस्ट २०२३ ते जानेवारी २०२४ या काळात स्मॉल कॅप फंडांमध्ये २२ हजार कोटी रुपये तर मिडकॅप फंडामध्ये १३,००० कोटी रुपये आकर्षित झाले. ही रक्कम काही छोटी नाही आणि ती लहान लहान गुंतवणूकदारांची आहे. त्यामुळे त्यांचे रक्षण करणे, हे सेबीचे कर्तव्य आहे. कदाचित म्हणूनच या बाबतीत जास्त दक्षता बाळगली जात असून एकूणच व्यवहारांमध्ये उत्तम पारदर्शकता रहावी, यासाठी सेबी महत्वपूर्ण पावले उचलत आहे.

शेअर बाजार सध्या चांगलाच तेजीत आहे. सेन्सेक्स असो वा निफ्टी, निर्देशांक नवी उच्चांकी पातळी गाठत आहे. २०२४ मध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार येईल आणि देशात स्थिर स्थिर राजवट असेल, अशी आशा व्यापारी, कारखानदार, आयातदार-निर्यातदार, दलाल आणि देशी-विदेशी गुंतवणूकदारांना वाटत आहे. नवनवीन गुंतवणूकदार बाजाराकडे खेचले जात असून देशातील डिमॅट खात्यांची संख्या १३ कोटींच्या पुढे जाऊन पोहोचली आहे. परंतु त्याच वेळी फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. अलिकडेच बँक ऑफ इंग्लंडकडून व्याजदर कपातीबाबत सकारात्मक संदेश संकेत दिले गेले असून अनुकूल जागतिक संकेतामुळे भांडवली बाजार उत्साहात आहे, हे खरे आहे. आर्थिक विकासदरही अपेक्षेपेक्षा जास्त असल्याचा दावा केला जात आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात मिड कॅप आणि स्मॉल कॅप फंडांमध्ये डिसेंबर २०२२ नंतर सर्वाधिक घसरण अनुभवास आली. या काळात लार्ज कॅप निर्देशांकात तीन टक्क्यांची घसरण झाली असताना स्मॉल आणि मिडकॅप निर्देशांकांमध्ये मात्र अनुक्रमे साडेपाच टक्के आणि ४.५६ टक्के इतकी घसरण दिसून आली. या पार्श्वभूमीवर सेबीचे पूर्ण वेळ सदस्य कमलेशचंद्र यांनी भांडवली बाजारातील हेराफेरीपासून सावध रहा आणि दलालांवर लक्ष ठेवा, असे आवाहन केले आहे. गेल्या अडीच वर्षांमध्ये देशातील गुंतवणूकदारांची संख्या दुपटीने वाढली आहे आणि गेल्या वर्षभरात डिमॅट खात्यांमध्ये २० टक्क्यांची भर पडली आहे. परंतु गुंतवणूकदारांच्या विश्वासाला तडा गेला तर एकाच दिवसात होत्याचे नव्हते होऊन जाते. त्यामुळेच शेअर बाजारावर नजर ठेवण्यासाठी सेबी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली वापरत आहे.

तंत्रज्ञानाधारित वित्तीय कंपन्यांनी वापरात आणलेले रोबो सल्लागार आता बऱ्यापैकी रुळले आहेत. ते कृत्रिम बुद्धिमत्ता यंत्रणेशी जोडलेले असतात. ते कंपनीच्या समभागाची भूतकाळातील कामगिरी आणि विविध गुणोत्तरांचा अभ्यास करून गुंतवणूकदारांना भविष्यातील अपेक्षित कामगिरीची सूचना देत असतात. रोबो अर्थात यंत्राच्या माध्यमातून संशोधन आणि संख्यात्मक विश्लेषणाद्वारे पुढे आलेला सल्ला हा खात्रीशीर असतो. या शिवाय व्यापारी किंवा ट्रेडर्सना भांडवली बाजारातील गुंतवणुकीबाबत निर्णय घेण्यासाठी ऐतिहासिक आकडेवारी आणि विविध खरेदी-विक्री प्रारूपांचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरते. शेअरखान, निओ, एंजेल ब्रोकिंग एआरक्यू किंवा फाइव्ह पैसा यासारख्या आघाडीच्या दलाली पेढ्या निर्धारित केलेली बाजार रणनीती आणि बाजारातील कल बघून स्वयंचलितपणे गुंतवणूक योजनांची रीत (अर्थात 'अल्गोरिदम') वापरतात. त्यासाठी 'एआय' उपयुक्त ठरते. सामान्य गुंतवणूकदाराच्या दृष्टीने पहायचे झाल्यास रोबो सल्लागाराला म्हणजेच यांत्रिक प्रणालीला गुंतवणूकदाराची इत्थंभूत माहिती दिली जाते. यामध्ये त्याची जोखीम घेण्याची क्षमता, गुंतवणूक मूल्य, गुंतवणूक कालावधी आदी माहितीच्या आधारे गुंतवणुकीचे निर्णय घेतले जातात अथवा सुचवले जातात. याला गुंतवणूकदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

शेअर बाजारात 'एआय'च्या अर्थात रोबोच्या सल्ल्याने समभाग खरेदी-विक्रीचे व्यवहार करताना समभागाची खरेदी आणि विक्री कोणत्या किमतीला अथवा पातळीला करायची हे संगणकीय पद्धतीने आधीच ठरलेले असते. यामुळे संगणकाद्वारे खरेदी-विक्रीचे व्यवहार स्वयंचलितपणे कार्यान्वित केले जाऊ शकतात. शिवाय गुंतवणूकदारांना याच पद्धतीने अतिलोभावर नियंत्रण राखणेदेखील शक्य होते. तिथे भावनेला स्थान नसते. दुसरा मुद्दा आर्थिक शिस्तीचा. भांडवली बाजारात व्यवहार करताना आर्थिक शिस्त महत्त्वाची असते.

बाजारात नुकसान होण्याची भीती किंवा थोडा अधिक नफा मिळवण्याची इच्छा यासारख्या भावनिक कारणांमुळे अनेकदा शीस्त मोडीत निघण्याची भीती असते; मात्र ऑटोमेटेड ट्रेडिंग ही शिस्त राखण्यास मदत करते. याशिवाय वेळेची बचत होते. सेकंदा-सेकंदाला कोट्यवधींचे व्यवहार होऊन बाजारात समभागांची किंमत सारखी बदलत असते. काही नॅनो सेकंदांचा विलंबदेखील नफ्यावर परिणाम करू शकतो. अशा वेळी 'एआय' प्रणालीचा वापर खूप फायदेशीर ठरतो. जागतिक पातळीवर अनेक देशांमध्ये हे तंत्रज्ञान अतिशय प्रगत असून अनेक गुंतवणूकदार त्याकडे आकर्षित होत आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकेत शिकागोस्थित न्यूरेन्सिकचे व्यवहार आकृतिबंधाचे विश्लेषण करणारे मंच आणि सिएटल येथे मुख्यालय असलेले केवूटचे 'के-स्कोअर' हे डेटा विश्लेषण मंच 'एआय'च्या वापरातून समभागांच्या खरेदी-विक्रीचे निर्णय घेतात. भारतातील रोबो-सल्लागार अद्याप प्राथमिक टप्प्यावर आहेत. इथे ते अजून तरी तितकेसे लोकप्रिय झालेले नाहीत.

आजकाल

# मोदींचा करिश्मा संपत चालल्याची लक्षणे

**तुषार गायकवाड**

राज्यात महायुतीमध्ये महावाद सुरु आहेत. खरं तर आपण २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणूका पाहिलेल्या आहेत. या दोन्ही लोकसभेच्या निवडणूकीत मोदी-शहांकडून जो उमेदवार दिला जात असे त्या उमेदवाराच्या प्रचाराचे काम घटकपक्ष व कार्यकर्ते पूर्ण ताकदीने करताना दिसत होते. मात्र लोकसभा २०२४ निवडणूकांत असे चित्र अजिबात नाही. उदाहरणादाखल ८ लोकसभा मतदारसंघ घेऊ...

१) रावेरः रावेर मधून भाजपाने खासदार रक्षा खडसे यांनाच परत उमेदवारी दिली आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कार्यकर्त्यांना न्याय दिलेला नाही. मतदारसंघातील जनसंपर्काकडे दुर्लक्ष केले. याचा परिणाम त्यांच्याविरोधात नाराजी उफाळून आली आहे. रक्षा खडसे यांचा पराभव समोर दिसू लागताच भाजपाने सासरे एकनाथ खडसे यांना भाजपमध्ये परत घेण्यासाठी युध्दपातळीवर हालचाली सुरु केल्यात.

२) हिंगोलीः हिंगोली मधून शिंदे गटाने खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी दिली खरी, मात्र भाजपचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह मतदारांचाही हेमंत पाटील यांना तीव्र विरोध सुरु झाला. त्यामुळे ऐनवेळी उमेदवार बदलाच्या हालचाली सुरु झाल्यात. उमेदवार बदलला नाही तर भाजपवाले हा उमेदवार पराभूत करणार आहेत. तर उमेदवारी भाजपला दिल्यास शिंदे गट भाजपाच्या विरोधात मतदान करणार आहे. अशी परिस्थिती या मतदारसंघात आहे.

३) बुलढाणाः बुलढाण्यातून शिंदे गटाचे विद्यमान खासदार प्रताप जाधव यांनी आज आपली उमेदवारी दाखल केली. पण त्यांना शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांचा कडवा विरोध असून त्यांनी अपक्ष उमेदवारी घोषित करत उमेदवारी अर्जही खरेदी केला आहे. शिंदेसेनेच्या या गोंधळात उमेदवार पराभूत होण्याची भिती असल्याने भाजपाचे निवडणूक प्रमुख माजी आमदार विजयराज शिंदे यांनी काल उमेदवारी दाखल केली आहे.

४) यवतमाळः मोदींना राखी बांधणाऱ्या खासदार भावना गवळी यांच्या विरोधात जनतेत संतापाची लाट असल्याने त्यांची उमेदवारी कापण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदेना दिले आहे. या मतदारसंघातून संजय राठोडांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. अर्ज दाखल करण्यासाठी अवघे ३ दिवस उरलेत तरी उमेदवारी निश्चिती झालेली नाही. एकूणच राठोड किंवा गवळी दोघांचीही उमेदवारी धोक्यातच आहे.

५) हातकणंगलेः शिंदे गटाचे विद्यमान खासदार धैर्यशील माने यांच्या उमेदवारीस भाजपाचा तीव्र विरोध आहे. उमेदवार न बदलल्यास पराभूत करण्याचा इशारा भाजपा व महायुतीच्या घटक पक्षांनी दिल्याने उमेदवार बदलाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. ऐनवेळी उमेदवार बदलला तर धैर्यशील माने नाराज तर उमेदवार न बदलल्यास जागा पराभूत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

६) माढाः माढ्यातून विद्यमान खासदार रणजितसिंग नाईक निंबाळकर यांना उमेदवारी दिल्याने भाजपाच्या समर्थकांनी यापूर्वीच बंड केले होते. धैर्यशील मोहीते पाटील यांची नाराजी काढण्यात काही अंशी भाजपाला यश आले होते. मात्र निंबाळकरांनी मोहीते-पाटलांच्या विरोधात मोहीम उघडल्याने धैर्यशील मोहीते पाटील तुतारी हाती घेण्याचा निर्णय जाहीर करणार आहेत. धैर्यशील मोहीते-पाटील यांना भाजपाने रोखल्यास प्रवीणदादा गायकवाड तुतारी चिन्हावर तुल्यबळ उमेदवार असतील.

७) साताराः सातारा लोकसभा मतदारसंघ भाजपला लढायचा नाही म्हणून अजित पवारांना सोडलाय. मात्र राज्यसभेचे खासदार उदयनराजे भोसले यांनी उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष लढण्याचा पवित्रा घेतला. भाजप त्यांच्यापुढे हतबल असल्याने त्यांनी उदयनराजेंना तूर्तास शब्द दिलाय. मात्र अजित पवार हे उदयनराजेंनी घड्याळ चिन्हावर लढावे म्हणून आग्रही आहेत. उदयनराजे अजित पवारांच्या नेतृत्वात काम करण्यास अजिबात राजी नाहीत. याउलट साताऱ्यातून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना उमेदवारी देण्याचा पर्याय शरद पवारांकडे असल्याने या मतदारसंघात महायुतीचा पराभव जवळपास निश्चित झालेला आहे.

८) परभणीः परभणी लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार संजय हरिभाऊ जाधव हे शिवसेना उध्दव ठाकरे गटात आहेत. त्यांच्या विरोधात अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवार द्यावा म्हणून हा मतदारसंघ अजित पवारांना सोडला. मात्र अजित पवारांनी बारामतीत जानकरांची मदत घेण्यासाठी परभणी मतदारसंघातून जानकरांना उमेदवारी दिली. जानकरांचा स्वतःचा रासप हा पक्ष असताना त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाची उमेदवारी घेतली. मात्र घड्याळ चिन्हावर निवडणूक न लढवता शिट्टी, सफरचंद, रोडरोलर चिन्हांची मागणी केलीय.

तर अशा तऱ्हेने या ८ लोकसभा मतदारसंघातील चित्र पाहीले की आपल्या लक्षात येतेय की, मोदी नावाची आणि कमळ चिन्हाची लोकप्रियता सपशेल ढासळली असल्याने मोदींच्या आदेशाला कोलदांडा देवून महायुतीत महाकुस्ती सुरु आहे. हे चित्र तुम्हाला कोणत्याही न्यूज चॅनेलवर पहायला वा वृत्तपत्रात वाचायला मिळणार नाही.

लोकसंसद

## निवडणूक आयोगाला नोटीस

अठराव्या लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी ऐन रंगात आली असतानाच मतदारांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यासाठी प्रचाराचे वेगवेगळे फंडे राजकीय पक्षांकडून वापरले जात आहेत. मात्र अशावेळी दुसरीकडे काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून व विरोधी पक्षांकडून ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीनच्या कार्यप्रणालीवर संशय घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. विशेषतः ईव्हीएम मशीनमधील मते आणि व्हीव्हीपॅटमधील सर्व मते मोजली जावीत यासाठी काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. सध्याच्या पद्धतीनुसार एखाद्या लोकसभा मतदारसंघाच्या प्रत्येक विधानसभा क्षेत्रातून निवडलेल्या कोणत्याही पाच ईव्हीएममधील मते आणि व्हीव्हीपॅटमधील मतदार पत्रिका पडताळून पाहिल्या जातात. त्याऐवजी सर्वच ईव्हीएममधील मते आणि व्हीव्हीपॅटमधील मतदार पत्रिकांची मोजणी करण्याचे आदेश आयोगाला द्यावेत अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकेच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीस पाठवली आहे. वास्तविक यापूर्वीही यासंदर्भातील अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात आल्यानंतर फेटाळल्या गेल्या आहेत. आता निवडणूक आयोग अठराव्या लोकसभेच्या पहिल्या टप्प्याचे मतदान जवळ आले असताना या नोटीशीविषयी काय निर्णय घेतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**चार एप्रिल**

**१८८२:-** कवी, संस्कृत ग्रंथाचे गाढे अभ्यासक, भाषांतरकार मुकुंद गणेश मिरजकर यांचा जन्म. अनेक संस्कृत ग्रंथाची त्यांनी भाषांतरे केली. त्यापैकी 'मनुस्मृती, श्रीमद्भागवत भाग १ व २, कर्मयोग अथवा श्रीमत्भगवतगीता' या महत्त्वाच्या ग्रंथाखेरीज 'सुभाषित - पुष्पमकरंद' हे व्यंकटाश्वरी या कवीच्या संस्कृत वेच्यांचे पद्यरुपांतर अशी साहित्यसंपदा. **१८९१:-** कवी त्रावणकोर संस्थानाचे प्रधान माधवराव (सर) टी यांचे निधन. त्यांचे घराणे मूळचे महाराष्ट्रीयन. माधवरावांनी मोरोपंताच्या धर्तीवर अनेक आर्या रचल्या. तसेच आपल्या काव्यातून विविध विषय हाताळले. कुटूंब, इष्टमित्र हे त्यांच्या काव्याचे विषय. कवितेवर इंग्रजी विचारसरणीचा प्रभाव. त्यांच्या कवितांचे दोन भाग त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द. पंडिती काव्यपरंपरेतील पांडित्यप्रचूर काव्यरचना करणारे कवी म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. **१९१६:-** लेखक, कापूस तज्ञ डॉ. भालचंद्र अवधुतराव फडणीस यांचा जन्म. 'कापूस', 'महाराष्ट्रातील कडधान्ये', 'पुष्पराज गुलाब', 'महाराष्ट्रातील गळीत धान्य' अशी कृषीविषयक पुस्तक प्रसिध्द. **१९२३:-** लेखिका कुंदा पारसनिस यांचा जन्म. त्या रविकिरण मंडळाचे संस्थापक श्री बा रानडे यांच्या कन्या. 'अनार्यावर्त' ही सिंधू संस्कृतीवरील कादंबरी, 'दा', 'राजकन्येचा वाढदिवस' ह्या विनोदी नाटिका, 'क्षमाचे वळण' हा कथासंग्रह प्रसिध्द. **१९३२:-** लेखिका आणि सौंदर्य प्रसाधनाचा शास्त्रशुद्ध पध्दतीने मार्गदर्शन करणाऱ्या पहिली मराठी महिला सिंधू डोक्रस यांचा जन्म. ह्यांचा 'प्रसाधना' हा सौंदर्य प्रसाधनावरील मराठीतील पहिलाच ग्रंथ. तसेच या विषयावर रेडिओ, टी.व्ही आणि नियतकालिकांतून विपुल प्रमाणात लेखन. **१९३६:-** लेखक, चरित्रकार, कायदेपंडित, वक्ते असलेल्या गणेश रघुनाथ अभ्यंकर यांचे निधन. कायदयाची पदवी संपादन केल्यावर सांगली, मिरजेत त्यांनी वकिली व्यवसायाचा आरंभ केला. तत्कालिन राजकारणात संस्थानी राजकारणातील एक तज्ञ ही आणखी एक त्यांची ओळख. विचारांनी ते नेमस्तवादी असून नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे ते अनुयायी होते. त्याच प्रभावामुळे 'गोखल्यांचे चरित्र' त्यांनी १९१५ साली लिहिले. याशिवाय 'राष्ट्रीय सभा, तिची उत्पती व वाढ' हे त्यांचे आणखी एक महत्त्वाचे पुस्तक. याशिवाय 'अबूचा पहाड' हे त्यांचे स्थलवर्णनपर पुस्तकही प्रसिध्द आहे. 'दुष्काळ' या पुस्तकातून दुष्काळाचे स्वरुप, दुष्काळाचा कायदा व दुष्काळ फंड याची माहिती दिली. 'सांगली म्युनिसिपालटी' या नावाने सांगलीचा ५० वर्षाचा इतिहास लिहिला. राज्यघटनाविषयक प्रश्नांवरही इंग्रजी नियतकालिकामधून त्यांनी विपूल लेखन केले. १९४६:- नाटककार प्र. ल. मयेकर यांचा जन्म. विनोदी, रहस्यमय, थरारक अशी विविध प्रकारची नाटके त्यांनी लिहिली. 'रानभूल','पांडगो इलो रे बा इलो', 'रमले मी' ही त्यांची काही गाजलेली नाटके. मयेकर यांनी कथा, एकांकिका, नाटक असे विपुल लेखन केले होते. व्यावसायिक नाटककार म्हणून प्रसिध्दी मिळण्यापूर्वी मयेकर हे सुमारे दहा वर्ष हौशी रंगभूमीवर एकांकिकाकार व नाटककार म्हणून काम करत होते. काही वर्षे त्यांनी 'बेस्ट'मध्ये नोकरीही केली. 'मा अस साबरीन', 'अथं मानूस जगन हं' ही त्यांची सुरुवातीची नाटके होती. मयेकर यांची बहुतांश नाटके 'चंद्रलेखा' नाट्यसंस्थेतर्फे सादर झाली होती. यात 'रमले मी', 'दीपस्तंभ', 'आसू आणि हासू', 'गोडगुलाबी' यांचा समावेश आहे. 'रातराणी' आणि 'पांडगो इलो रे बा इलो' ही नाटके 'भद्रकाली प्रॉडक्शन' ने रंगभूमीवर आणली होती. 'मिस्टर नामदेव म्हणे', 'तक्षक याग' 'अंत अवशिष्ट', 'सोनपंखी' ही त्यांची आणखी काही नाटके आहेत. मयेकर यांचे 'काचघर' व 'मसिहा' हे कथासंग्रहही प्रसिध्द आहेत. 'कळसूत्र', 'अतिथी', 'रक्तप्रपात' या एकांकिकांचे लेखनही त्यांनी केले आहे. **१९५०:-** लेखक, पत्रकार केसरीचे उपसंपादक संजय दिनकर कुलकर्णी यांचा जन्म. 'नगरवधू' ही कादंबरी त्यांच्या नावावर आहे. **१९५७:-** पत्रकार, लेखक राजेंद्र रामचंद्र राजेशिर्के यांचा जन्म. ह्यांचा 'करवीचं फुल' हा कथासंग्रह प्रसिध्द. १९६७:- ग्रामीण कथाकार, कवी, चारोळीकार, वात्रटिकाकार राजेंद्र बापू शिंदे यांचा जन्म. **१९७९:-** कवयित्री संगीता अनिल घोटे यांचा जन्म. ह्यांचा 'सूर्यदीप' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९९६:-** 'हा जय नावाचा इतिहास आहे', 'आनंदध्वजाच्या कथा' या पुस्तकातून पुराणे व महाकाव्यांकडे पाहण्याची नवी दृष्टी देऊ पाहणारे लेखक आत्माराम नीलकंठ साधले म्हणजेच 'आनंद साधले' यांचे निधन. महाराष्ट्र रामायणफ हे खंडकाव्य, रुक्मिणी स्वयंवराचा अनुवाद व काही बालसाहित्य अशी त्यांची बहुविध निर्मिती होती. **२०००:-** लोकगीतांचे संग्राहक, अनुवादक, कथाकार नरेश कवडी यांचे निधन. त्यांच्या अनुवादीत साहित्यात व्हॉल्टेअरच्या कादंबरीचा 'कारिद' या नावाने अनुवाद तसेच 'बर्नार्ड शॉ वाङ्मय आणि विचार' हा डॉ. सेमगुप्त यांच्या इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद, डॉ.राजेंद्रप्रसाद यांच्या 'आत्मकथा' या हिंदी आत्मचरित्राचा अनुवाद तसेच दामोदर मावजींच्या 'कार्मेलीन' या कोकणी कादंबरीचा अनुवाद अशी साहित्य संपदा. **२०२३ :** रंगभूमीवर सातत्याने प्रयोगशील लेखन आणि दिग्दर्शक करणारे सुप्रसिध्द नाटककार अजित भगत यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# आघाडी टिकवण्याचे बारणेंना आव्हान

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीकडून उमेदवारांच्या नावाची घोषणा झाली आहे. ७ मे रोजी पार पडत असलेल्या या निवडणुकीत महायुतिकडून श्रीरंग बारणे यांना तिसऱ्यांदा संधी देण्यात आल्याने यांच्या समोर विजयासाठी गत वेळी मिळवलेली आघाडी टिकवण्याचे आव्हान आहे. तर महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्यासमोर बारणे यांची आघाडी तोडण्याचे मोठे आव्हान असल्याने आघाडी टिकवण्यासाठी आणि तोडण्यासाठी दोन्ही उमेद्वारांना आपली ताकत पणाला लावावी लागणार आहे.



२०१९ साली पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत भाजप आणि शिवसेना महायुतीच्या उमेद्वारासमोर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवाराचे आव्हान होते.

महायुतीचे उमेद्वार बारणे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस पक्षांकडून अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना निवडणूक रिंगणात उतरवण्यात आल्याने त्या वेळची निवडणूक अटीतटीची होणे अपेक्षित होते. मात्र, निवडणूकीनंतर आलेल्या निकालात मावळ मतदार संघातील सहा विधानसभा मतदार संघापैकी ५ विधानसभा मतदार संघातून बारणे यांनी मोठी आघाडी घेत पार्थ पवार यांना मागे टाकत विजय मिळवल्याचे पाहायला मिळाले होते.

२०१९ मधील मावळ लोकसभा मतदारसंघात एकूण २२ लाख ९७ हजार ४०५ मतदारांपैकी १३ लाख ६६ हजार ८१८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

## राजकीय गणितं बदलणार

**राज्यात घडलेल्या अभूतपूर्व राजकीय उलथापालथीमुळे राज्यातील निवडणूकांची राजकीय गणितं बदलणार आहेत. मावळ लोकसभा मतदार संघ देखील याला अपवाद नसून,२०१९ मध्ये एक मेका विरोधात लढलेले शिव सेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष दुभंगले आहेत. दुभंगलेल्या दोन्ही पक्षातील २०१९ चे विजयी आणि पराभूत उमेदवार भाजपा सोबत महायुतीच्या माध्यमातून एकत्रितपणे निवडणूक लढत असल्याने दुभंगलेल्या पक्षातील किती मतदार मूळ पक्षातील उमेदवाराला मतदान करतात यावर युती आघाडीतील मतांचे आणि आघाडीचे गणित ठरणार आहे.**

## विधानसभा निहाय आकडेवारी

**पनवेल**
श्रीरंग बारणे यांना १ लाख ६० हजार ३८५
पार्थ पवार यांना १ लाख ५ हजार ७२७
बारणे आघाडी ५४ हजार ६५८

**कर्जत**
श्रीरंग बारणे ८३ हजार ९९६
पार्थ पवार ८५ हजार ८४६
पार्थ आघाडी १८५०

**उरण**
श्रीरंग बारणे ८९ हजार ५८७
पार्थ पवार ८६ हजार ६९९
बारणे आघाडी २८८८

**मावळ**
श्रीरंग बारणे १ लाख ५ हजार २७२
पार्थ पवार ८३ हजार ४४५
बारणे आघाडी २१ हजार ८२७

**चिंचवड**
श्रीरंग बारणे १ लाख ७६ हजार ४७५
पार्थ पवार ७९ हजार ७१७
बारणे आघाडी ९६ हजार ७५८

**पिंपरी**
श्रीरंग बारणे १ लाख ३ हजार २३५
पार्थ पवार ६१ हजार ९४१
बारणे आघाडी ४१ हजार २९४

**पोस्टल मतदान ३ हजार ३५७**
श्रीरंग बारणे १ हजार ७१३
पार्थ पवार १ हजार ३७५
बारणे आघाडी ३३८

# महाविकास आघाडीकडून वैशाली दरेकरांना उमेदवारी

**। ठाणे । वृत्तसंस्था ।**



महाविकास आघाडीकडून कोणाला उमेदवारी दिली जाते याची उत्कंठा संपली असून वैशाली दरेकर राणे यांना ठाकरे गटाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. दरेकर यांनी २००९ साली मनसेकडून लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यावेळी एक लाखाच्या आसपास त्यांना मते पडून त्या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या होत्या. आता त्या शिवसेना ठाकरे गटाकडून निवडणूकीच्या रिंगणात उतरत असून खा. शिंदे यांच्यापुढे कोणते आव्हान उभे करतात हे पाहणे औत्सूत्याचे ठरेल.

ठाणे जिल्हा हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असून या जिल्ह्यातील ठाणे व कल्याण लोकसभा मतदार संघ आपल्या हातातून जाऊ नये यासाठी त्यांची लढाई सध्या सुरु आहे. महायुतीमधील मित्रपक्ष भाजपकडून त्यांची कोंडी होत असून सुपुत्र श्रीकांत याचा मतदारसंघ हा भाजपकडे जाऊ नये तसेच आनंद दिघे यांनी खेचून आणलेला ठाणे मतदारसंघ देखील आपल्या हातून जाऊ नये यासाठी शिंदे गट प्रयत्नशील आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजप विरुद्ध शिवसेना शिंदे गट असे वातावरण असल्याने त्याचा फायदा करुन घेण्याचे शिवसेना ठाकरे गटाने ठरविले आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत, सुषमा अंधारे या नेत्यांनी कल्याण पूर्वेत सभा घेत हा मतदारसंघ गाजवला. ठाकरे गट येथे आपली ताकद लावून शिंदे यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण करणार याची चर्चा आधीपासून येथे सुरु होती.

ठाकरे गटाकडून माजी आमदार सुभाष भोईर, काँग्रेसचे संतोष केणे, केदार दिघे यांचे नाव आघाडीवर असतानाच ठाकरे यांनी माजी नगरसेविका वैशाली दरेकर यांना उमेदवारी जाहीर करुन सर्वांना अवाक केले आहे.

## अभय पाटील यांना उमेदवारी

**अकोला :** अकोला लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या रिंगणात काँग्रेसने डॉ. अभय पाटील यांना उतरवले आहे. सोमवारी (दि.१) रात्री पक्षाने त्यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे अकोल्यात पुन्हा एकदा परंपरेनुसार तिरंगी लढत होणार आहे. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून राजकीय मोर्चेबांधणीला जोर आला आहे. अकोला मतदारसंघात भाजपने खासदार संजय धोत्रे यांचे पुत्र अनुप धोत्रे यांना, तर वंचित बहुजन आघाडीकडून स्वतः ॲड. प्रकाश आंबेडकर निवडणूक लढत आहेत.

## भाजपाचे घूमजाव

**वसई :** पालघर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खा. राजेंद्र गावित यांना विरोध केल्यानंतर भाजपाने सारसारव करून घुमजाव केले आहे. गावित यांना विरोध केल्याचे पत्र शहर अध्यक्षाने उत्साहात काढले असून ती त्यांची वैयक्तिक भूमिका असल्याचे भाजपाने बुधवारी स्पष्ट केले. महायुतीमधील पालघर लोकसभा मतदारसंघाच्या जागेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. भाजपाने या मतदारसंघाची मागणी केली आहे तर शिंदे गटाने या जागेवर दावा सांगितला आहे.

## खा.गवळी मुंबईत तळ ठोकून

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक आहे. तरी देखील यवतमाळ-वाशिममध्ये शिंदेंच्या शिवेसेने उमेदवार जाहीर केलेले नाहीत. खा. भावना गवळी मुंबईत तळ ठोकून असून त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पुन्हा भेट घेतली. शेवटच्या क्षणापर्यंत निर्णय का होत नाही? असा सवाल सध्या केला जात आहे. यवतमाळ-वाशिम मतदारसंघात गवळी यांचा उमेदवारीवर दावा आहे. मात्र, संजय राठोड यांच्याही नावाची चर्चा आहे. मात्र, लोकसभा लढण्यास त्यांनी नकार दिला आहे. तर संजय राठोडांनी लढावं अशी शिंदे गटाच्या कोअर टीमची इच्छा आहे.

## खडसेंचा भाजप प्रवेशाला पुर्णविराम

**जळगाव :** एकनाथ खडसे भाजप येण्यासाठी धडपड करत असल्याचे गिरीश महाजन गेल्या काही दिवसांपूर्वी म्हटले होते. त्यावर खडसे म्हणाले की, गेल्यावेळी मीच या प्रश्नाचे उत्तर दिलेल आहे मला प्रयत्न करण्याची आवश्यकता नसते. मला जर भाजपमध्ये यायचं असेल तर माझ्या वरिष्ठ पातळीवर मोदी, शहा, नड्डा यांच्याशी थेट संबंध आहेत. मला भाजपमध्ये जायचे असेल तर मी सर्वांना विश्वासात घेऊन जाण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे या संपूर्ण चर्चांना तूतास पूर्णविराम मिळाला आहे.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

**। मुंबई, । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून ४० प्रचारकांच्या नावांचा यामध्ये समावेश आहे.



राष्ट्रवादीने जाहीर केलेल्या या पहिल्या यादीत अमोल कोल्हे, निलेश लंके, राजेश टोपे, एकनाथ खडसे, रोहिणी खडसे याशिवाय, फौजिया खान, पी. सी. चाको, धीरज शर्मा, वंदना चव्हाण, धीरज शर्मा, सिराज मेहंदी, सोनिया दुहान, शब्बीर विद्रोही, यशवंत गोसावी, बाळासाहेब पाटील, पार्थ पोळके, ॲड. जयदेव गायकवाड, शशिकांत शिंदे, अशोक पवार, अरुण लाड, प्राजक्त तानपुरे, सुनील भुसार, नसीम सिद्दीकी, विकास लवंडे, रोहित पाटील, राजू आवळे, मेहबूब शेख, प्रकाश गजभिये, पंडित कांबळे, रवी वरपे, नरेंद्र वर्मा, राज राजापूरकर, संजय काळबांडे, जावेद हबीब, सक्षणा सलगर आणि पूजा मोरे यांचा समावेश आहे.

# रत्नागिरी-सिंधुदूर्गचा पेच सुटेना

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपावरून महायुतीमध्ये काही जागांवरून वाद सुरू आहेत, यामध्ये रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाचा समावेश आहे. शिवसेनेकडून उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत या मतदारसंघातून लढण्यासाठी इच्छुक आहेत, तर भाजपनेही या मतदारसंघावर दावा केला आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप नेते नारायण राणे यांनी महत्त्वपूर्ण विधान केले आहे. मतदारसंघ भाजपचा आहे, कोणीही लुडबूड करू नये, असे राणे म्हणाले.



दुसरीकडे रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी त्यांच्या निवासस्थानी मतदारसंघातील शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक गुरुवारी (दि.४) होणार आहे. दुसरीकडे राणेदेखील सिंधुदुर्गामध्ये शक्तीप्रदर्शन करणार आहे. त्यामुळे महायुतीमधील शिवसेना आणि भाजपमध्ये मतदारसंघावरून जोरदार रस्सीखेच सुरूच आहे.

सध्या शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे विनायक राऊत हे खासदार आहेत. उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा राऊत यांना उमेदवारी दिली आहे. तर शिवसेना-भाजप युतीमध्ये मात्र, या मतदारसंघावरून एकमत होताना दिसत नाही.

या लोकसभा मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदीच उमेदवार असतील असे म्हणत सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी लोकसभेच्या उमेदवारीबाबत बोलणे टाळले आहे.

# उमेदवाराने जमा केली चिल्लर

**। वाशिम । वृत्तसंस्था ।**



मनोज गेडाम नावाच्या व्यक्तीने उमेदवारी अर्ज भरताना १२ हजार ५०० रुपयाची चिल्लर निवडणूक आयोगाला नामनिर्देशन पत्रासोबत जमा केली आहे. ही रक्कम मोजत असताना कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक झाली. यवतमाळ वाशिम लोकसभेच्या उमेदवारीचा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असताना अपक्ष उमेद्वार गेडाम यांनी १२ हजार ५०० रूपये चिल्लर स्वरूपात निवडणूक विभागाकडे जमा केले. त्यामुळे प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांच्या नाकीनऊ आले.

मी गोर गरीब जनतेची अनेक वर्ष सेवा करत आलो आहे आणि त्यांनीच मला या निवडणुकीत उभे राहण्यासाठी एक, दोन, पाच आणि दहा रुपये अशी रक्कम जमा करून दिली आहे. त्यामुळेच सामान्य जनता माझ्या पाठीशी आहे त्यामुळे मी ही लोकसभा निवडणूक मी जिंकणार असे त्यांनी सांगितले आहे. जनतेने दिलेली रक्कम मी इथे जमा करण्यास घेऊन आलो आहे असे गेडाम यांनी सांगितले आहे.

# नाशिकच्या जागेसाठी महायुतीत घडामोडी

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीचं पहिल्या टप्प्यातील मतदान अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहेत. पण अजूनही महयुतीमधील जागांचा तिढा अद्याप सुटताना दिसत नाही. विशेष म्हणजे नाशिकच्या जागेसाठी पडद्यामागे जोरदार हालचाली घडत आहेत. या जागेवर सध्याच्या घडीला शिवसेनेचा खासदार आहे. पण या जागेसाठी आधी भाजप जास्त आक्रमक होती. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या जागेसाठी जास्त आक्रमक आहे. असे असले तरी शिवसेनेचे विद्यमान खा. हेमंत गोडसे नाशिकची जागा सोडण्यासाठी तयार नाहीत. हेमंत गोडसे हे गेल्या १० वर्षांपासून नाशिकच्या जागेवर खासदार आहेत. त्यामुळे या जागेवर आपल्यालाच उमेदवारी मिळावी यासाठी गोडसे हे आग्रही आहेत.



गोडसे यांनी आपल्या उमेदवारीसाठी मुख्यमंत्री शिंदे यांची गेल्या १५ दिवसांत अनेकवेळा भेट घेतली आहे. पण तरीही यांची उमेदवारी निश्चित होताना दिसत नाही. नाशिकच्या जागेचा तिढा सोडवण्यासाठी मुंबईत हाय व्होल्टेज घडामोडी घडण्याची दाट शक्यता आहे. नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे आपला यवतमाळचा दौरा अर्धवट सोडून मुंबईच्या दिशेला रवाना झाले, तर राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ हे देखील मुंबईच्या दिशेला रवाना झाले आहेत.

नाशिकचे खा. गोडसे, शिवसेना पदाधिकारी भाऊ चौधरी यांच्यासह इतर महत्त्वाचे पदाधिकारी हे मुंबईत ठाण मांडून आहेत. नाशिकची जागा शिवसेनेलाच मिळावी यासाठी गोडसे प्रयत्नशील आहेत. नाशिकच्या जागेसाठी मुंबईत महत्त्वाच्या घडामोडी आणि बैठका घडत आहेत.

## रावेरमध्ये चुरस

**रावेर :** रावेर मतदारसंघ म्हणजे, पूर्वीचे भाजपचे दिग्गज नेते आणि सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात असणाऱ्या खडसेंचा गड. जिल्ह्यात प्रामुख्याने लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. एक म्हणजे जळगाव आणि दुसरा रावेर लोकसभा मतदारसंघ. गेली अनेक वर्ष भाजपच्या तावडीत असलेला रावेर मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत मात्र चुरस दिसून येत आहे. आघाडीकडून कोणालाही उमेदवारी दिली तरी रावेरमध्ये चुरस रंगणार याच काही शंकाच नाही.

# हातकणंगलेत तिहेरी लढत

**। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।**



हातकणंगले लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार हे जवळपास निश्चित झालं आहे. कारण शिवसेना ठाकरे गटाने हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवार देणार आहे. हातकणंगलेत मविआकडून माजी आ. सत्यजित पाटील यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. सत्यजित पाटील हे शिवसेना ठाकरे गटाचे शाहूवाडी पन्हाळाचे माजी आमदार आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी हे महाविकास आघाडीत येण्यास तयार नसल्याने, अखेर मविआ आपला उमेदवार मैदानात उतरवणार आहेत. इथं शिंदे यांच्या शिवसेनेकडून खासदार धैर्यशील माने आणि शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी हे मैदानात आहेत. त्यात आता ठाकरे गट सत्यजित पाटील यांना उमेदवारी देणार असल्याने, हातकणंगले मतदारसंघात तिहेरी लढत होणार आहे. दरम्यान शिवसेनेचे माजी आमदार सुजीत मिणचेकर आणि सत्यजित पाटील दोघांना मातोश्रीवर बोलावणार आहेत.

# कदमांमुळे सोलापूरात चुरस



**। सोलापूर । वृत्तसंस्था ।**

सोलापूर लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातील चुरस दिवसेंदिवस वाढत चालली आहे. वंचितच्या उमेदवारामुळे रंगत आलेली असताना पुन्हा एकदा राम सातपुते आणि प्रणिती शिंदे यांची धाकधूक एमआयएमने वाढवली आहे. सोलापूर लोकसभा निवडणुकीत फक्त भाजप आणि काँग्रेस अशी लढत होईल की काय अशी परिस्थिती असताना वंचित आणि एमआयएममुळे निवडणुकीला आणखी रंग चढणार आहे. सोलापूर मतदारसंघाकडे माजी मुख्यमंत्र्यांची मुलगी आणि उसतोड मजुराचा मुलगा असे पाहिले जात आहे. या दोघांच्या लढाईत माजी आ. रमेश कदमांची एन्ट्री झाली आहे. तुरुंगात असताना मोहोळ विधानसभा मतदारसंघातून जवळपास २४ हजार मतांची लीड रमेश कदम यांना मिळाली होती. एमआयएमची पतंग रमेश कदमांनी हाती घेतली तर कुणाची दोरी कापतील याकडे संपूर्ण जिल्ह्याचे आणि राज्याचे लक्ष लागले आहे.

# सकाळी पक्षप्रवेश; सायंकाळी उमेदवारी

## 'वंचित'कडून अफसर खान मैदानात

**। छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस नेते तथा महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते अफसर खान यांनी मंगळवारी (दि.२) सकाळी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. त्यानंतर सायंकाळी लोकसभेच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मतदार संघातून वंचितने खान यांना उमेदवारी घोषित केली.

सर्वप्रथम एमआयएमतर्फे पुन्हा इम्तियाज जलिल यांना उमेदवारी दिली. त्यापाठोपाठ महाविकास आघाडीकडून शिवसेना नेते ठाकरे गटाचे माजी खा. चंद्रकांत खैरे यांच्यावर विश्वास टाकण्यात आला. दुसरीकडे भाजप आणि शिवसेना यांच्या यादीचे अद्याप ठरले नाही.



अशा परिस्थितीत वंचितच्या भूमिकेकडे लक्ष होते. त्यानंतर मंगळवारी सकाळी घाई-घाईत खान यांचा वंचितमध्ये प्रवेश सोहळा उरकण्यात आला. यावेळी खान यांनी भूमिका व्यक्त करताना ॲड. प्रकाश आंबेडकर हे सर्व जाती-धर्मांच्या लोकांना सोबत घेऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतात, त्यांनी उमेदवारी दिल्यास पूर्ण ताकदीने लढणार असे सांगितले होते. पत्रकार परिषदेनंतर खान यांनी कार्यकर्त्यांसह थेट अकोला गाठून ॲड. आंबेडकर यांची भेट घेतली. त्यानंतर सायंकाळी वंचितच्या पाच जणांच्या यादीत छत्रपती संभाजीनगरसाठी खान यांना उमेदवारी जाहीर झाली. म्हणजे लोकसभेच्या तिकिटावर शिक्कामोर्तब करुनच खान वंचितमध्ये आल्याचे स्पष्ट झाले.

# 'तरुणांची लग्नं, हेच आपलं उद्दिष्ट'

**। सांगोला । वृत्तसंस्था ।**

माढा मतदारसंघातील पाण्याचा प्रश्न, उद्योगधंदे, नोकरीची समस्या, शेतीमालाला हमीभाव या मूलभूत प्रश्नांसह आजकाल तरुणांच्या लग्नांचा ज्वलंत प्रश्न उपस्थित होत आहे. मतदारसंघातील तरुणांची लग्नं करणं, हेच आपलं उद्दिष्ट असणार आहे. हा प्रश्न माढा मतदार संघातीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातला प्रश्न आहे. या प्रश्नावर प्रामुख्याने मी काम करणार असल्याचे मत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारसकर यांनी व्यक्त केले.



माढा लोकसभा मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारसकर यांनी मंगळवारी (दि.२) सांगोल्यात पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी बारसकर यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना एका वेगळ्या मुद्द्याला हात घातला आहे. माढा लोकसभा मतदारसंघासह राज्यभरातील तरुणांची ३० ते ३५ वर्षे उलटून गेल्यानंतरही लग्नं होत नाहीत.त्यांच्या लग्नाची ही समस्या सोडविण्यासाठी आपण प्राधान्याने काम करणार आहे, अशी घोषणा त्यांनी केली.

# उमेदवार बदलण्यासाठी शिंदेंवर दबाव

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटण्याच्या अंतिम टप्प्यावर असल्याचे सांगितले जात असतानाच आता महायुतीसमोर उमेदवार बदलावा लागण्याचं नवीन आव्हान उभं राहिल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या गटाने जाहीर केलेल्या आठ जागांपैकी दोन जागांवरील उमेदवार बदलला जाईल अशी चर्चा आहे.**

यासंदर्भातील माहिती शिंदे गटाचे आ. संजय शिरसाट यांनीच दिली आहे. शिरसाट यांनी एखादा उमेदवार कमजोर वाटत असल्यास मुख्यमंत्री तो उमेदवार कधीही बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही असे म्हटले होते.

याच पार्श्वभूमीवर हिंगोलीचे उमेदवार हेमंत पाटील यांच्याबरोबरच हातकणंगलेचे उमेदवार धैर्यशील माने यांची उमेदवारी रद्द करुन नवे उमेदवार दिले जाण्याची दाट शक्यता आहे.



या ठिकाणी भाजपाकडून एकनाथ शिंदेवर दाबव टाकला जात आहे की काय अशी शंका उपस्थित होऊ लागली आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनीही हिंगोलीमधील उमेदावारासंदर्भात सूचक विधान केल्याचे सांगितले जात आहे.

## तीन उमेदवार बदलण्याची चर्चा

**संजय शिरसाट यांनीही थेट हिंगोली, हातकणंगले मतदारसंघाचा उल्लेख करत उमेदवार बदलले जाऊ शकतात असे म्हटले आहे. दिलेला उमेद्वार कमोजर असल्यासारखं वाटले तर मुख्यमंत्री शिंदे उमेदवार बदलू शकतात असे शिरसाट म्हणाले. हिंगोली आणि हातकणंगलेबरोबरच यवतमाळ-वाशिमचा उमेदवारही बदलला जाण्याची दाट शक्यता आहे.**

# शिवसेना ठाकरे गटाची दुसरी यादी जाहीर

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

शिवसेना ठाकरे गटाने लोकसभा उमेद्वारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यावेळी ४ उमेद्वारांची घोषणा करण्यात आली. काही दिवसांपुर्वी ठाकरे गटाकडून १७ जणांची पहिली यादी जाहीर करण्यात आली होती. बुलढाणा- नरेंद्र खेडेकर, यवतमाळ-वाशिम - संजय देशमुख, मावळ - संजोग वाघेरे-पाटील, सांगली -चंद्रहार पाटील, हिंगोली - नागेश पाटील आष्टीकर, छत्रपती संभाजीनगर - चंद्रकांत खैरे, धाराशिव - ओमराजे निंबाळकर, शिर्डी- भाऊसाहेब वाघचौरे, नाशिक - राजाभाई वाजे, रायगड - अनंत गीते, सिंधुदुर्ग-रत्नागिरी - विनायक राऊत, ठाणे - राजन विचारे, मुंबई-ईशान्य - संजय दिना पाटील, मुंबई-दक्षिण - अरविंद सावंत, मुंबई-वायव्य - अमोल कीर्तिकर, परभणी - संजय जाधव, मुंबई दक्षिण मध्य - अनिल देसाई, कल्याण लोकसभा - वैशाली दरेकर, हातकणंगले - सत्यजीत पाटील, पालघर - भारती कामडी, जळगाव - करण पवार हे उमेद्वार आहेत.

## शिंदे गटाचे प्रचारक अडचणीत

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातर्फे निवडणूक आयोगाकडे शिवसेना शिंदे पक्ष आणि भाजपच्या विरोधात लोकप्रतिनिधित्व अधिनियम आणि आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल निवडणूक आयोगाने घेतली आहे. अन्य राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या नावाचा उल्लेख केल्याचं नमूद करत शिंदेच्या पक्षाने लोकप्रतिनिधित्व अधिनियमाचे उल्लंघन केल्याचे मान्य केले.

## निवडक

### मातीच्या माठांना मागणी

**उरण :** अनेक ठिकाणी कडक उन्हाची झळ सर्वत्र बसत असून अशातच होणाऱ्या गरमीपासून व वाढत्या तापमानापासून स्वतःचा बचाव करण्याकरीता सर्वजण खटाटोप करत आहेत. तसेच, माठातील पाणी आरोग्यास चांगले असल्याने सर्व नागरिक माठामधील पाणी पिण्यास पसंती देत असून उरण परिसरातील गावागावात व शहराच्या ठिकाणी माठांना वाढती मागणी मिळत आहे. त्याचप्रमाणे हातगाडीवर हे माठ विकतांना विक्रेते जागोजागी दिसत आहेत.

### प्राथमिक विद्यालयाचे यश

**खरोशी :** गोरेज फाऊंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या ऑल इंडिया स्तरावरील ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप (बिडीएस) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून सु.ए.सो मराठी प्राथमिक विद्यालय कळंबोली या शाळेने नेत्रदिपक यश संपादन केले. शाळेचा निकाल १००% लागला असल्याने सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील, प्राचार्य पालवे, संस्थेचे अध्यक्ष वसंत ओसवाल, सचिव रविकांत घोसाळकर आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

### पेणकरांना दूषित पाणीपुरवठा

**पेण :** पेण शहराकरिता नगरपरिषदेकडून भोगावती नदी पात्रातून पाणी उचलण्यात येते. तेच पाणी पेणकरांना पिण्याकरिता पुरवण्यात येते. परंतु, त्याच नदीपात्राच्या दोन्ही बाजूला सुमारे ५० मीटर अंतरावर शहरातून येणारे गटाराचे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट पात्रात सोडले जाते. त्यामुळे पेण शहरातील नागरिकांना थेट गटाराचे पाणी पिण्याकरता मिळत आहे. पेण शहरवासीयांना होणारा दूषित पाणीपुरवठा बंद करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

### वीज कर्मचाऱ्यांचा सावळागोंधळ

**उरण :** वीजेचे बील भरूनही अनिल पडते यांच्या मालकी हक्काच्या दुकानाचे वीज मीटर महावितरणच्या वीज कर्मचाऱ्यांनी काढून नेले आहे. विशेष म्हणजे महावितरणने कोणतीही नोटीस न देता, मेसेज न टाकता, न कळविता वीज मीटर काढून नेले आहे. कोणतीही थकबाकी नसताना, कोणाच्या तरी सांगण्यावरून कारवाई केल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कोणतेही चूकीचे कारण नसताना वीज मीटर तोडून नेल्याने वीज कर्मचाऱ्यांचा सावळा गोंधळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

### संगम नदी पात्राची स्वछता

**तळा :** तालुक्यातील वानस्ते व राणेंची वाडी दरम्यान वाहणाऱ्या संगम नदी पात्राची विद्यार्थ्यांकडून स्वच्छता करण्यात आली. तालुक्यातील ही महत्वाची नदी असून धरणाच्या येणाऱ्या पाण्यामुळे या नदीला नेहमीच पाणी असते. याच ठिकाणी असणाऱ्या पुलावरून सतत नागरिकांची व वाहनांची वर्दळ असते. जाणारे-येणारे नागरिक या नदीत कचरा टाकत असल्याचे काही विद्यार्थ्यांच्या लक्षात आले व त्यांनी नदी पात्रातील कचरा साफ करण्याचे काम हाती घेतले.

# सांडपाणी प्रकल्पातील चेंबरला होल

## अपघात होण्याची दाट शक्यता

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरातील सांडपाण्याचे व्यवस्थापन कारण्यासाठी ई मलनिसारण प्रकल्प उभारला जात आहे. सध्या हॉटेल लाईनवर चेंबर बनविण्याची कामे सुरु असून नव्याने बनविलेल्या चेंबरला होल पडले आहेत. त्यामुळे त्यात घोड्यांचा पाय अडकून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या कामाबद्दल शंका उपस्थित होत आहेत.

माथेरानमधील सांडपाणी शहरातून दरीमध्ये जाऊ नये यासाठी राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशाने महाराष्ट्र शासनाने सांडपाणी प्रकल्प मंजूर केला आहे. त्या प्रकल्पाच्या कामाबद्दल माथेरानमधील नागरिक नाराज आहेत. स्थानिकांची नाराजी लक्षात घेऊन माथेरान नगरपरिषदेकडून सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम काही दिवस थांबवून ठेवण्यात आले होते. मात्र, आता पुन्हा या प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर देखील ठेकेदार कंपनीकडून पुन्हा एकदा स्थानिकांची नाराजी ओढवून घेत आहे.

सध्या शहरातील हॉटेल लाईन भागात कामे सुरु आहेत. त्या भागातील एका हॉटेल समोरील रस्त्यावर बसविण्यात आलेले सिमेंट चेंबर फुटली आहेत. त्या भागातून माल



वाहतूक करणारे घोडे तसेच माथेरान शहरात हॉटेलमध्ये आलेले पाहुणे-पर्यटक हे याच रस्त्याने मुख्य बाजारपेठ भागात त्यांची ये-जा सुरु असते. तसेच, या भागातील रस्त्यावर पूर्णपणे विजेचे दिवे देखील नाहीत. त्यामुळे त्या फुटलेल्या चेंबरमध्ये पर्यटक आणि घोड्यांचा पाय अडकून अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबबाबत पर्यटकांची वाहतूक करणारे अश्वपालक यांनी नाराजी व्यक्त केली असून पालिकेने तात्काळ चेंबर दुरुस्ती करून घेण्यात यावेत, अशी मागणी स्थानीकांकडून करण्यात येत आहे.

या चेंबरबद्दल माथेरानमधील अश्वपालक यांच्याकडून माथेरान नगरपरिषद, पालिका मुख्याधिकारी तसेच पालिका अभियंता यांना कळविले आहे. त्याबाबत पालिका अभियंता अभिमन्यू येळवंडे यांच्याकडून माहिती घेतली असता, ते कर्जत नगरपरिषदमध्ये असून त्या चेंबरबद्दल माहिती घेत आहेत. तसेच, माथेरानमध्ये आल्यावर तात्काळ पाहणी करून ठेकेदाराला निर्देश देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

# आयुर्वेदिक शिबिरात रुग्णांची तपासणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

फिलान हर्बो मेडिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्यावतीने चिरनेर कातळपाडा येथे मंगळवारी (दि.२) आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. नजम अली कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरात नाडी परीक्षणाद्वारे डॉ. नजम अली कादरी यांनी आजारांचे निदान करून रुग्णांना मार्गदर्शन केले.

या शिबिरात परिसरातील नागरिक, अबाल वृद्ध, महिला, विद्यार्थी या सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्य तपासणी करून घेतली. या आयुर्वेदिक शिबिरात थायरॉईड, मुतखडा, मुळव्याध, मधुमेह, कावीळ, दमा, सर्दी, खोकला, सांधेदुखी, गुडघेदुखी, वातरोग, चर्मरोग, पोट वाढणे, स्त्रियांचे आजार, शौचास साफ न होणे,



भूक न लागणे, अपचन, केस गळणे, डोकेदुखी, दंत विकार, अल्सर, गॅस, पित्त, जळजळ, अशक्तपणा, वजन वाढविणे, वजन कमी होणे आदी रोगांची तपासणी नाडी परीक्षणाद्वारे करण्यात आली. तसेच, स्त्रियांच्या आरोग्याविषयी माहिती आणि व्यंधत्वाविषयी तपासणी करण्यात आली. तसेच त्यावरील उपाय योजनांबाबत डॉ. कादरी यांनी मार्गदर्शन केले.

# किरण कांबरीचे जल्लोषात स्वागत



**। नेरळ । वार्ताहर ।**

सैन्य दलात भरती होऊन देशसेवा करण्याची स्वप्ने अनेकांची पूर्ण होतातच असे नाही. सैनिक सीमेवर जीवाची बाजी लावून देशाचं संरक्षण करीत असतो. पण हा सैनिक जेव्हा देशसेवा करुन पुन्हा एकदा घरी परततो तेव्हा प्रत्येकाचं ऊर अभिमानाने भरुन येते. असाच अनमोल क्षण कर्जत तालुक्यात पाहायला मिळाला. १९वर्ष देशाचे रक्षण करून सुखरूप घरी परतणाऱ्या कांबरी कुटूंबातील एका जवानाचे त्याच्या राहत्या घरी गावकऱ्यांनी जंगी स्वागत केलं.

तालुक्यातील पोशीर गावातील तरूण किरण कांबरी हा २००५ साली भारतील स्थलसेना सैन्यदलात हवालदार पदावर भरती झाला होता. त्यांने तब्बल १९ वर्ष देशसेवा केली आणि आपल्या आयुष्यातील उमेदीला काळ देशसेवेसाठी अर्पण केला. १९ वर्षानंतर हा तरूण सेवानिवृत्त झाला.

यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मनोहर थोरवे, राहुल विशे, सावळाराम जाधव, विजय हजारे, हनुमंत भगत, ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.



मुरूड परिसरात दुपारी कडक उन्हाचा तडाखा बसू लागला आहे. म्हणून कोळी बांधवांची मुले समुद्राच्या गार पाण्यात उडी मारताना.
(छायाचित्र-सुधीर नाझरे)

# विस्तारीत गावठाणाच्या मान्यतेबाबत सुनावणी

**। उरण । प्रतिनिधी ।**



मंत्रालय येथील लोकायुक्त यांच्या कार्यालयात लोकायुक्त मा.कानडे यांच्यासमोर मंगळवारी (दि.२) बालई ग्रामविकास परिषद व सिडको यांच्यात विस्तारीत गावठाणाला मान्यतेबाबत सुनावणी पार पडली.

सिडकोने या विरोधात आपले म्हणणे मांडले. या सुनावणीला अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी उपस्थित होते. १९७३ च्या शासनाच्या अधिसूचनेनुसार एमआरटीपी कायद्याअंतर्गत नागांव, केगांव, रानवड, चाणजे, बोकडविरा, पागोटे, फुंडे, नवघर येथील १५६० हेक्टर जागा सिडकोद्वारे संपादित करण्याला गावठाण विस्तार तज्ञ राजाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बालई ग्रामविकास परिषदेने आक्षेप घेतला होता. लोक आयुक्तांच्या या सुनावणीला सारडे ग्रामविकास समितीचे अध्यक्ष मनोज पाटील यांनी आपले मत मांडताना उरणच्या गावागावात गावठाण मान्यतेसाठी ग्रामकमिट्या स्थापन होऊन गावठाणाला मान्यता प्राप्त करण्यासाठी शासनाला प्रस्ताव सादर केले जातील व शासनाला विस्तारीत गांवे नियमित करावी लागतील, असे सांगितले. पुढील सुनावणी २४ जुलै रोजी होणार असून बालई व इतर सात गावांतील ग्रामस्थांनी सुनावणी वेळी उपस्थित रहावे, असे आवाहन सचिव रवींद्र चव्हाण यांनी केले.

# हरिभाऊ घाग सेवानिवृत्त

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील रोठ बु. ग्रामपंचायत कर्मचारी हरिभाऊ घाग हे रविवारी (दि.३१) मार्च रोजी सेवानिवृत्त झाले. महिला कार्यशाळा सभागृहात हरिभाऊ घाग यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ, पत्रकार, प्रतिष्ठीत नागरिक व कर्मचारी वृंद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. त्यांची ढोल ताशांच्या गजरात ग्रामपंचायत ते श्री क्षेत्र भवानी गावदेवी मंदिर व गावच्या वेशीपासून ते घरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१
- अकाऊंटंट पाहिजे- जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३१११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.
- विक्री आणि marketing व्यक्ती आवश्यक आहे । किमान पदवी पूर्ण केलेला । ०-२ वर्षे अनुभव । प्रतिस्पर्धी पगार । marketing कौशल्ये असली पाहिजेत Accountant आवश्यक आहे । टॅली अनिवार्य । ०-२ वर्षे अनुभव । सर्व दुकान खाते घेणे पाहिजे । दुकानमधून काम । प्रतिस्पर्धी पगार रसिक हार्डवेअर । फोन नंबर: +९१ ९४२२६९०८५४
- अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास ३०० नग सोललेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१

# पोलीस ठाण्याला नवीन इमारत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून उभे असलेल्या माणगाव येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासाची पडझड झाली होती. या वसाहतीची गेले अनेक दिवसांपासून दुर्दशा झाल्यामुळे हे निवासस्थान भूतबंगालच बनले होते. सरकारने येथील पोलीस वसाहतीतील कर्मचारी, अधिकाऱ्यांची निवास बांधकाम करण्याकडे गेली अनेक दिवसापासून पाठच फिरवली होती. त्यामुळे हे निवासस्थान दुर्लक्षित राहिले. इथल्या राज्यकर्त्यांच्या आकसामुळे पोलीस



ठाणे १०० वर्षानंतरही इंग्रज सरकारनी बांधलेल्या इमारतीतच चालत होते. तर, निवास मोडकळीस आल्याने कर्मचाऱ्यांना भाड्याच्या खोलीत आश्रय घ्यावा लागत होता. नागरिक व प्रसिद्धी माध्यमांनी यावर आवाज उठवल्यामुळे माणगाव पोलीस ठाण्याला नवीन स्वंतत्र व सर्वसोयींनीयुक्त इमारत मिळणार आहे. तसेच, कर्मचाऱ्यांचे निवासही प्रशस्त जागेत उभारण्यात येणार आहे.

## माणगावच्या वैभवात भर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असणारा माणगाव तालुका हा दिवसेंदिवस विकसित होत आहे. उद्योगधंदे, व्यवसाय व करमणुकीच्या विविध साधनांमुळे तसेच वॉटर पार्क आणि रिसॉर्ट यांसारख्या आकर्षणामुळे येणारे पर्यटक, शालेय विद्यार्थ्यांना विरंगुळा म्हणून या साऱ्या गोष्टींचा आनंद घेता येत असतो. असाच एक आनंद देणारा एस.के. वॉटर पार्क आणि रिसॉर्ट माणगाव तालुक्यात साकारण्यात आले आहे. हे वॉटर पार्क पर्यटकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी आकर्षण असणार आहे.

# पेण परिवहन कार्यालयातर्फे नवीन मालिका

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात ०६ दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना खाजगी चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क (तीनपट शुल्क) भरुन हवे असतील त्यांनी शुक्रवारी (दि.५) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते दुपारी ०२.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खासगी वाहन विभागात डीडी, पत्याचा पुरवा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी सायंकाळी ४.०० वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येण्याचे सांगण्यात आले आहे.

# कळंबोलीत पोलिसांचे संचलन

**। पनवेल । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी मंगळवारी (दि.२) कळंबोली शहरात नवी मुंबई पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलिस ठाण्याचे वपोनि राजेंद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली संचलन करण्यात आले. कळंबोली पोलिस ठाण्यातून काढण्यात आलेल्या या संचलनामध्ये १२ अधिकारी ७९ अंमलदार सहभागी झाले होते. यावेळी



महत्त्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परिसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाच्या ठिकाणी संचलन करण्यात आले.

# आदिवासींना भकास करणारा विकास

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलमधील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परियोजनेमधून काही गावे नुकतीच वगळण्यात आली आहेत. परंतु, १२४ गावांमध्ये नवनगर म्हणून निर्देशीत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचा दि.०४ मार्चचा निर्णय जाहीर झाला आहे. ही अधिसूचना प्रसिद्ध झाली



असून पेण तालुक्यातील ८० गावांचा समावेश आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता नाही. तसेच, केवळ जमीन मालकच नव्हे तर शेतमजूर, शेतीचा जोडधंदा करणारे मच्छिमार, गणपती कारखानदार व इतर संलग्न उद्योग करणाऱ्या छोट्या-मोठ्या कारागीरांवर याचा परिणाम होणार आहे. येथील भूमिहीन आदिवासींना विचारात घेतलेले नाही. या प्रकारचा विकास हा आदिवासींचे जीवन भकास करणारा आहे, असे प्रतिपादन डॉ.वैशाली पाटील यांनी केले.

# मॅकविला द जंगल यार्डची ‘वानरटोक’ मोहीम

***। पाली/गोमाशी । वार्ताहर ।***

*रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील वानरटोक सुळका मोहीम ‘मॅकविला द जंगल यार्ड’च्या मॅकमोहन, संदीप काळे, पंकज गावकर या आरोहकांनी रविवारी (दि.३१) मार्च रोजी फत्ते केली. सागरगडाच्या दक्षिण टोकासमोरच वानरटोक सुळका आहे. गडाच्या टोकाच्या डाव्या बाजूवरून खाली उतरणाऱ्या पायवाटेने सुळका व गड यांमधील खिंडीत दोरीच्या सहाय्याने सुरक्षीत पोहोचता येते. या खिंडीतूनच आरोहणाची सुरूवात करण्यात आली.*

मुंबईहून कोणत्याही ऋतूत एका दिवसात करण्यासारखा किल्ला म्हणजे सागरगड उर्फ खेडदुर्ग. सिद्धेश्वर मंदिराच्या अलिकडे असलेली वाट डोंगर पठारावरील सागरगड माची गावात अर्ध्या तासात पोहोचवते. याच वाटेने गावातून पुढे गेल्यावर व डोंगराला वळसा घातल्यावर सागरगडाची तटबंदी दिसू लागते. अजून अर्ध्या तासात कोसळलेली तटबंदी चढून बालेकिल्ल्यात प्रवेश करतो. सागरगड माची गावातून सागरगडाकडे जाताना ठिकठिकाणी दगडावर बाणांच्या खुणा केल्या आहेत, त्या पाहूनच पुढे जावे. विशेषतः पावसाळ्यात धुक्यामुळे वाट चुकण्याचा संभव असतो. याशिवाय गडावर पोयनाडहून वाघोलीमार्गे जाता येते. तसेच, वडवली गावातूनही



गडावर जाता येते.

येथील वानरटोक व सागरगडाच्या मधल्या खिंडीतून आरोहणाची सुरुवात मकमोहन, संदीप काळे व पंकज गावकर या आरोहकांनी सकाळी १० वाजता केली. पहिला टप्पा ३० फूट आरोहण करून वरच्या धारेवर पोहोचले. दूसरा टप्पा १० फूट उभं आरोहण करत तिसरा टप्पा ५० फूट सुळक्याला उजवीकडे ठेवून वळसा घालत मागच्या बाजूला पोहाचले. अंतिम टप्पा ३० फूट मागील बाजूने सरळ नाध्याच्या दिशेनं आरोहण करून दुपारी १ वाजेपर्यंत माथा गाठण्यात आरोहकांना यश आले.

### गडाचा इतिहास

अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावर आणि धरमतरच्या खाडीवर लक्ष ठेवण्यासाठी हा किल्ला बांधण्यात आला होता. शिवाजी महाराजांसारख्या दूरदृष्टीच्या राजाने सागरी किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी खांदेरी, कुलाबा, सर्जेकोट या किल्ल्याची निर्मिती करेपर्यंत सागरगडावरच अलिबाग पट्ट्यातील समुद्र किनाऱ्याच्या रक्षणाची भिस्त होती. या किल्ल्याचे नाव सागरगड असले तरी समुद्रकिनाऱ्यापासून हा किल्ला ५ मैल दूर आहे. माचीवर १०० घरांची वस्ती आहे. तसेच, इ.स. १६६५ मध्ये शिवाजी राजांनी मोगलांबरोबर केलेल्या पुरंदरच्या तहात जे २३ किल्ले मोगलांना दिले त्यात सागरगडचा (खेडदुर्गाचा) समावेश होता.

# परमारच्या विद्यार्थ्यांना बजाज ऑटोमध्ये नोकरी



**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोशिअल/चॅरिटेबल ट्रस्टच्या वेलशेत येथील शेठ श्री.ओटरमल शेषमल परमार कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये पुणे येथील बजाज ऑटो प्रायव्हेट लिमिटेडचे रवींद्र वाघचौरे यांच्याकडून मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या थेट मुलाखती नुकत्याच घेण्यात आल्या. यामध्ये १८ विद्यार्थ्यांची बजाज ऑटो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत नियुक्ती करण्यात आली आहे. थेट मुलाखती यशस्वी होण्यासाठी परमार डिप्लोमा इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रा. वैभव नांदगावकर, प्रा. विशाल पाटील, प्रा.रुपेश थळे, प्रा.सागर सुरेकर, प्रा.अमोल गावीत, प्रा.ऋत्विज माने तसेच सर्व शिक्षक, कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले.

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी श्याम शिद, शिवंम चाळके, सेजल पाटील, श्रीयोग गावंड, वरुण पाटील, नंदन म्हात्रे, केदार देशमुख, प्रज्वल खंडागळे, मयूर मोकल, सर्वेश भगत, प्राची वाळवे, तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी-सुमित यादव, प्रशांत नायकोडी, सोहम पाटील, विनय पाटील, अंकुर जाधव, संकल्प जुईकर, जनार्दन रसतले यांची बजाज ऑटोमध्ये नियुक्ती झाल्याने सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन, कार्तिक जैन संस्थेचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी वर्गाकडून अभिनंदन करण्यात आले.

# वाढत्या काहिलीमुळे उसाच्या रसाला पसंती

**उरण :** गेल्या काही दिवसांपासून राज्यासह तालुक्यात उकाडा वाढला आहे. तापमानाचा पारा वाढू लागल्याने नोकरी किंवा इतर कामानिमित्त बाहेर पडणाऱ्यांना गरमीचा सामना करावा लागत आहे. अशावेळी नागरिकांना विविध शीतपेयांचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र, यातील अनेक शीतपेये आरोग्याला घातक असल्याने नारळ पाणी, लिंबू पाणी, ताक आणि सर्वात जास्त उसाच्या रसाला पसंती मिळत आहे. यामुळे शहरातील अनेक उसाच्या रसाची विक्री करणाऱ्या रसवंतीगृहामध्ये गर्दी होताना दिसत आहे.

उरण परिसरात उन्हाचा तडाखा वाढला आहे. सध्या कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांच्या घशाला कोरड पडू लागली आहे. त्यामुळे अनेक जण शरीराला थंडावा मिळण्यासाठी गुणकारी अशा उसाच्या रसाला महत्त्व देत आहेत. सध्या शहरामध्ये रसवंतीगृहासह हातगाड्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# महापालिका मुख्यालयात बैठक



**। पनवेल । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडणेसाठी आचारसंहिता पथकाची बैठक बुधवारी (दि. ४) महापालिका मुख्यालयात पथक प्रमुख अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, गट विकास अधिकारी संजय भोये, सनियंत्रण अधिकारी तालुका कृषी अधिकारी शरद गीते,सहाय्यक पथक प्रमुख सहाय्यक प्रशासन अधिकारी गुलाब बळीराम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आली.

आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मावळ यांच्या सूचनेनुसार ६ भरारी पथके कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. या बैठकीत भरारी पथकातील अधिकाऱ्यांना आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या, तसेच अधिकाऱ्यांचा अडचणी, शंका यावरती चर्चा करण्यात आली.

# विजय आर्मी स्कुलमध्ये प्रवेश सुरू

**रायगड :** पनवेल तालुक्यातील एकमेव निवासी सैनिकी शाळा असणाऱ्या विजय आर्मी स्कुल अ‍ॅन्ड ज़ुनिअर कॉलेज, चिखले (माध्यम सेमी इंग्रजी) येथे प्रवेश प्रक्रिया इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत सुरु झाली आहे. महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांसाठी शाळेत राहण्याची सोय आहे. इयत्ता ७ वी ते इयत्ता १२ वीसाठी ओबीसी आणि खुल्या संवर्गातील काही रिक्त जागांसाठी प्रवेश सुरु आहे.

तसेच इयत्ता सहावी व सातवीसाठी प्रवेश पूर्व परीक्षा येत्या ७ एप्रिल रोजी सकाळी साडे नऊ वाजता होणार आहे. अनिवासी विद्यार्थ्यांना देखील प्रवेश घेता येणार आहे. ११ वी विज्ञानसाठी ऑफ लाईन प्रवेश नोंदणी सुरु आहे. अधिक माहितीसाठी एम. के. मराठे ९८६७३०१७२५, डी. एन. गावंड ९८६७१२१९६२ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगड डाक विभाग अव्वल

**अलिबाग :** रायगड टपाल विभागाने वर्षभरात ६० हजार १२५ नवे खाते उघडण्यात यश मिळवले. उद्दिष्ट पूर्ततेचा हा प्रमाण १२८.७० टक्के इतके असून या कामगिरीमुळे रायगड विभागाने महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील दहा अव्वल टपाल विभागात स्थान मिळवले आहे. टपाल विभागाने देश व राज्य पातळीवर २९ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत बचतीच्या वेगवेगळ्या योजना सुरू करून नवीन खाते सुरू करण्यासाठी नया साल, नया जोश नावाची स्पर्धा आयोजित केली होती. रायगड टपाल विभागाचे अधीक्षक सुनील थळकर यांनी स्थानिक जिल्हा टपाल अधीक्षक म्हणून काम करत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देत विविध योजना राबवल्या.रायगड टपाल विभाग हा जरी ग्रामीण विभाग असला तरी इथे शहराप्रमाणे कामगिरी करता येईल, अशी मानसिकता निर्माण केल्याने चालू आर्थिक वर्षात शहरी विभागाला मागे टाकत महाराष्ट्र व गोवा राज्यात दहा उत्कृष्ट टपाल विभागांत स्थान मिळवले आहे. स्पर्धेत रायगड डाक विभागाने १२८.७० टक्के टार्गेट पूर्ण करत ६० हजार १२५ नवीन खाती उघडली आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती माधुरी मधुकर भुजबळ, रा.आर एच ए, परिधी को. ऑ. हौ. सोसायटी, प्लॉट नं. ९, पिल्लई कॉलेज जवळ, सेक्टर १६, न्यु पनवेल, पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३/१/अ | ०.६०.०० पो. ख ०.०६.७० | २.३० | श्री. ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे, वगैरे |
| | एकूण ०.६६.७० | | |

**यापैकी श्री . ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०.१६.०० हे.आर.पॉ.**


वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०४/०४/२०२४.

सही /-
**अ‍ॅड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे- बरणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकती, त्या मिळकतींचे मालक श्री. अजय यशपाल गुप्ता यांच्याकडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| सर्वे नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ५ | १ | ०.९३.४० | २.४४ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक, संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०४/०४/२०२४

वकील
**अ‍ॅड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता : नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## Change in Name

**I SHRAVANI SWAPNIL SURVE** RESIDENT AT 204, B WING, AAI ASHIRWAD BLDG., NIJAMPUR ROAD, MANGAON RAIGAD 402104, DECLARE AND AFFIRM AS UNDER, MY OLD NAME (BEFORE MARRIAGE) WAS **MINA MANOHAR TAMBE.** I HAVE CHANGED MY NAME TO **SHRAVANI SWAPNIL SURVE** FOR ALL FUTURE PURPOSES.

**SIGN**
**SHRAVANI SWAPNIL SURVE**
**(New Name)**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि श्री. नरेश भिकु खानेकर यांच्या मालकी वहीवाटीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. - रायगड येथिल**

| सर्व्हे नं. | एकुण हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २२/१ | ०-२०.०० | २.१९ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. नरेश भिकु खानेकर यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ०३/०४/२०२४.

**श्री. नरेश गोविंद शिंदे,** अ‍ॅडव्होकेट
पत्ता- मु. पो. पाली भोईआळी, ता. सुधागड,
जि. रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालिल वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक श्री. आकाश मंगेश पाटील, रा मु पो कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत बोलणी आमचे आशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये चालू आहेत. मिळकतीचे वर्णन की,

| गावाचे नांव | भूमापन क्रमांक व त्याचा उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड | २९९/२८ | ३.९३.०० | ३९.३० |
| | २९९/२९ | ४.०१.०० | ४०.१० |

सदरहु मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालिल सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकत पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी असल्याबाबत भरवसा विद्यमान मालकानी आमचे आशिलांना दिला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहू मिळकतींबाबत 'मालकी हक्काचे प्रमाणपत्र व शोध अहवाल (टायटल सर्टीफिकेट अ‍ॅण्ड सर्च रिपोर्ट)' देण्यात येईल तसेच आमचे आशिल वर नमुद मिळकतींबाबत व्यवहार करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे
अलिबाग
दि. ०३.०४.२०२४
जमिन मालकांची सही,

सही/-
**अ‍ॅड. अमित महेश्वर देशमुख**
पत्ता- वेधशाळेसमोर, ढबुवाडा, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा**
**जि.रायगड दरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स- २६९०४२**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन/कात-५/जन्ममृत्यू/जाहिरनामा/७६८/२०२४ दि. २०/०३/२०२४

## जाहीरनामा

अर्जदार श्री.धोंडू बाळोजी घुलघुले मु.निगुडशेत ता.तळा जि.रायगड यांनी या न्यायालयाकडे जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये नोंदणी आदेश मिळण्याकरीता अर्ज या न्यालयात दाखल केला आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांची मुलगी सुमन घोंडू घुलघुले हिचा जन्म दि.२७/१२/१९९८ रोजी मौजे निगुडशेत, ता.तळा जि.रायगड येथे झाला असून तीचे जन्म प्रमाणपत्र आवश्यक आहे, परंतु सदरहु नोंद ग्रामपंचायत निगुडशेत यांचेकडील अभिलेखामध्ये आढळुन आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांना त्यांची मुलगी सुमन घोंडू घुलघुले हिचे जन्म नोंद दि.२७/१२/१९९८ रोजीच्या जन्म/मृत्यू रजिष्टर मध्ये घेण्यासाठी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तसेच सुमन घोंडू घुलघुले यांच्या उपरोक्त नमुद प्रमाणे जन्म नोंदीबाबत कोणाचीही हरकत असल्यास या जाहीरनाम्याचे दिनांकापासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळविण्याच्या आहेत. तसेच सदर लेखनाद्वारे कळविण्यात येते की, सदरहु मुदतीत कोणाचीही योग्य हरकत/तक्रार दाखल न झाल्यास सदरहु प्रकरणी न्यायालय योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० मार्च २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

प्रोसेस जमा
दि.

अर्जदाराचे वकील : अ‍ॅड. अनिकेत गुरव

## जाहीर नोटीस

नि- ९/ड

**अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधिश-२ श्री. अे. वाय. थत्ते साो. यांचे कोर्टात**

नेता ०७/०५/२४
दि. चौ. अर्ज नं. ७३/२०२४

श्रीमती शामला विनायक म्हात्रे -- अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार ने हिने हिंदु मायनॉरीटी अ‍ॅन्ड गार्डीयनशिप अ‍ॅक्ट १९५६ चे कलम ८ (२) प्रमाणे कु. जिगिशा विनायक म्हात्रे व कु. विधी विनायक म्हात्रे यांची नैसर्गीक अज्ञानपालनकर्ती आई म्हणून गायत्री सहकारी गृहनिर्माण संस्था मधील बिल्डींग-बी मधील तळमजल्यावरील सदनिका नं. १, क्षेत्रफळ ६३६ चौ. फुट ही निवासी सदनिका विक्री करणेबाबत दाखला मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि.०७/०५/२०२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक ते हुकूम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. २/०४/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक,**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड अलिबाग**

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that our Client Nrupal Jayant Patil has informed us that he is the sole, absolute and lawful owner of the non-agricultural land more particularly described in the **Schedule** hereunder written **("Property").**

We have also been informed by our Client that the original document pertaining to the Property i.e., a Sale Deed dated 9th October 1997 registered in the Office of Sub-Registrar of Assurances-Alibag under registration no. 1686 of 1997 executed between Murari Rajaram Pednekar (therein as Vendor) and Nrupal Jayant Patil (therein as Purchaser) ("Document") has been misplaced/lost and the same is not traceable in spite of due and diligent search by our Client. Our Client has already lodged a document missing complaint before Alibag Police Station, bearing Lost Property Registration No. 64/2024 on 02/04/2024. Our Client has also informed to us that he has not deposited the said original Document with any person as security or otherwise.

All or any person claiming to be in possession of original of the said Document or otherwise having any right, title, interest, claim, demand and/or objections against/upon/in respect of/to the said Property by way of sale, exchange, lease, tenancy, license, trust, lien, maintenance, inheritance, possession, attachment, mortgage, charge, gift, lis-pendens or otherwise of any nature whatsoever and in howsoever manner is hereby requested to give written notice of the same to Zunjarrao & Co, 4th Floor, Jalaram Jyot Building, Janmabhoomi Marg, Fort, Mumbai - 400001, along with certified true copies of documents in support of such right, title, interest, claim, demand and/or objections within 7 (Seven) days from the date of publication of this Notice, failing which it shall be presumed that no such claim, demand or objection exists and even if such claim, demand or objection exists in law or otherwise, it shall be deemed that the claimant has relinquished such claim, demand or objection and/or waived any right to exercise such claim, demand or objection and any such claim or objection shall not be binding on our Client.

**THE SCHEDULE**

Non-agricultural land bearing Survey No. 23/3 admeasuring 5690 square meters situated at Village –Gunjis, Taluka – Alibag, District – Raigad and bounded as follows:

| | | |
|---|---|---|
| Towards East | : | Survey No. 24 |
| Towards South | : | Survey No. 32 |
| Towards West | : | Alibag–Rewas Road and Survey No. 23/2 |
| Towards North | : | Survey No. 23/1 |

Alibag,
Dated: 3rd day of April, 2024
Zunjarrao & Co.
Sd/-
Vikrant Zunjarrao
(Advocate & Solicitor)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि, मौजे खानाव ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती शिल्पा प्रताप गंभीर यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|
| खानाव ता. अलिबाग जि.रायगड | ४१/१ | ०-६३-१० पो.ख ०-०४-८० एकूण ०-६७-९० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही, अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक - ०४/०४/२०२४

**अ‍ॅड. आशिष संदीप रानडे**
रा. रानडे निवास तात्या रानडे मार्ग शिवलकर
नाका अलिबाग- रायगड, मो. नंबर ९२७०२९४५४५

## जाहीर समन्स

प्रोसेस जमा रु.
वादी तर्फे वकील - श्री. ए. एम. देशमुख
समरी सुट नंबर ९/२०२०

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

युनियन बँक ऑफ इंडिया .. वादी
विरुद्ध
गणेश केसरीनाथ बलकवडे व. १ ... प्रतिवादी

या जाहीर समन्सद्वारे प्रतिवादी नं. १ श्री. गणेश केसरीनाथ बलकवडे, रा.मु.थळ-चाळमळा, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड व प्रतिवादी नं.२ श्री. पवित्र लिंबाजी कोळी, रा.मु. थळ-चाळमळा, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांस कळवण्यात येते की, श्री. गणेश केसरीनाथ बलकवडे यांनी वादी यांचेकडून व्यवसायासाठी रु. ४,००,०००/- (अक्षरी रु. चार लाख मात्र) इतके कर्ज घेतलेले असून श्री. पवित्र लिंबाजी कोळी सदर कर्जासाठी जामिनदार आहेत. सदरचे कर्जखाते एन.पी.ए. झाल्याने वादी यांनी कर्जदार श्री. गणेश केसरीनाथ बलकवडे आणि त्यांचे जामिनदार यांचे विरुद्ध अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो यांचे न्यायालयात समरी सुट क्र. ९/२०२० दाखल केला असून त्यामध्ये थकीत कर्ज व त्यावरील व्याजाची रक्कम असे मिळून रु. ६,४१,५८१/- (अक्षरी रु. सहा लाख एकेचाळीस हजार पाचशे एक्याऐंशी मात्र) इतकी रक्कम व ती वसुल होईपर्यंतचे द.सा.द.शे. १८ टक्के दराने व्याज अशी रक्कम मिळण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांस काढलेल्या समन्सची बजावणी होत नसल्याचे आढळून आले आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांचा उपरोक्त पत्ता हा योग्य व बरोबर असूनही प्रतिवादी नं. १ गणेश केसरीनाथ बलकवडे व प्रतिवादी नं. २ श्री. पवित्र लिंबाजी कोळी यांचेवर समन्सची बजावणी होत नाही. प्रतिवादी नं. १. श्री. रमेश गोपाळ कवळे व प्रतिवादी नं. २ श्री. पवित्र लिंबाजी कोळी हे स्वत:वर समन्सची बजावणी होऊ देत नसल्याची वादी यांची खात्री झाल्याने प्रतिवादी नं. १ श्री. रमेश गोपाळ कवळे व प्रतिवादी नं.२ श्री. पवित्र लिंबाजी कोळी यांचे विरुद्ध जाहीर समन्सद्वारे समन्सची बजावणी व्हावी यासाठी वादीने मा. न्यायालयात अर्ज दिला होता व तो मा. न्यायालयाने मंजुर केला आहे.

सबब, उपरोक्त प्रतिवादी नं.१ श्री. रमेश गोपाळ कवळे व प्रतिवादी नं. २ श्री. पवित्र लिंबाजी कोळी यांस या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, हे समन्स प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या दहा दिवसांचे मुदतीत आपण स्वत: अगर आपले नेमलेले प्रतिनिधी किंवा वकील यांचेमार्फत मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर साो., अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक ०७-०५-२०२४ सकाळी ठिक १०.३० वाजता हजर राहावे व लिव टु डीफेंड करत अर्ज करावा. अन्यथा प्रतिवादी १ श्री. रमेश गोपाळ कवळे व प्रतिवादी नं. २ श्री. पवित्र लिंबाजी कोळी यांस सदरहु दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी एकतर्फी घेऊन निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. ०२ माहे एप्रिल २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**अधीक्षक**
**दिवाणी न्याया. वरिष्ठ स्तर**
**अलिबाग**

**लिपीक**
**दिवाणी न्याया. वरिष्ठ स्तर.**
**अलिबाग**

दि. ०३/०४/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ताडवागळे, ता.अलिबाग | ३९/२ | ०-२२-४७ पो.ख. ०-०२-०४ एकूण ०-२४-५१ | २.२५ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. याप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**अ‍ॅड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

**निवडक**

### रायडूकडून पांड्याचे सांत्वन

**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याची आयपीएलच्या १७ व्या हंगामात चांगली सुरूवात झालेली नाही. मुंबईचा कर्णधार झाल्यापासून हार्दिक पांड्याला अजून एकही सामना जिंकता आलेला नाही. त्यात नाराज चाहते प्रत्येक सामन्यात हूटिंग करून हार्दिक पांड्याचे जगणे मुश्किल करून टाकत आहेत.राजस्थान रॉयल्सविरूद्धच्या सामन्यात मुंबईला पराभव सहन करावा लागला. या पराभवानंतर मुंबईचा माजी खेळाडू अंबाती रायुडू मुंबई इंडियन्सच्या डग आऊटमध्ये हार्दिक पांड्याला धीर देताना दिसला.

### मंजूषाला तिहेरी मुकुट

**पुणे :** पंचकुला येथे नुकत्याच संपलेल्या ४६व्या राष्ट्रीय मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुण्याच्या मंजूषा सहस्त्रबुद्धेने तिहेरी मुकुटाचा मान मिळविला. पंचकुला येथे झालेल्या या स्पर्धेत मंजूषा सहस्त्रबुद्धेने ६० वर्षांवरील महिलांच्या एकेरी, दुहेरीसह मिश्र दुहेरीचेही जेतेपद पटकावले.एकेरीच्या अंतिम लढतीत मंजूषा सहस्त्रबुद्धेने सुनीता स्वामिनाथन वर २१-१०, २१-७ असा विजय मिळविला. तत्पूर्वी, उपांत्य फेरीत मंजूषा सहस्त्रबुद्धेने अर्पिता झव्हेरीचा २१-१५, २१-१४ असा पराभव केला होता.

### ब्रेसवेलकडे न्यूझीलंडचे नेतृत्व

**नवी दिल्ली :**अष्टपैलू खेळाडू मायकेल ब्रेसवेल पाकिस्तानविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेत न्यूझीलंडचे नेतृत्व करणार आहे. गेल्या वर्षी दुखापत झाल्यानंतर ब्रेसवेल या मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. ब्रेसवेलने गेल्या वर्षी मार्चपासून न्यूझीलंडकडून एकही सामना खेळलेला नाही. ब्रेसवेल प्रथमच किवी संघाची धुरा सांभाळणार आहे.न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने पाकिस्तानविरुद्धच्या २० मालिकेसाठी १६ सदस्यीय संघाची घोषणा केली.

### हॉकीचे राष्ट्रीय शिबीर

**पुणे :** हॉकी इंडियाने हॉकी महाराष्ट्राच्या सहा खेळाडूंची साई केंद्र, बेंगळुरू येथे होणाऱ्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरासाठी निवड केली आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये वैष्णवी फाळके (मिडफिल्डर; सातारा), काजल आटपाडकर (फॉरवर्ड; सातारा), अक्षता ढेकळे (मिडफिल्डर कम डिफेंडर; सातारा), मनश्री शेडगे (मिडफिल्डर; रायगड), ऋतुजा पिसाळ (फॉरवर्ड; सातारा) आणि भावना खाडे (मिडफिल्डर कम डिफेन्स; हिंगोली) यांचा समावेश आहे.

### मयंकचा प्रभावी मारा

**मुंबई :** पंजाबविरुद्धच्या लढतीत २७ धावा देत तीन फलंदाज बाद करीत सामन्याला कलाटणी देणारा वेगवान गोलंदाज मयंक यादव बंगळूरविरुद्धच्या लढतीतही चमकला. त्याने १४ धावांत तीन फलंदाजांना रस्ता दाखवला. एवढेच नव्हे, तर मयंक सातत्याने १५० किलोमीटर ताशी वेगाने चेंडू टाकत होता, हे विशेष. आखूड टप्प्याच्या चेंडूवर त्याने मॅक्सवेलला झेलबाद केले. कॅमेरुन ग्रीनचा त्रिफळा उडवला. आखूड टप्प्याच्या चेंडूवर त्याने रजत पाटीदार याला २९ धावांवर बाद केले.

# श्रीलंकेने मालिका जिंकली

**कमिंडू मेंडिस ठरला सामनावीर; दुसऱ्या सामन्यात बांगलादेशला १९२ धावांनी हरवले**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दुसऱ्या सामन्यात बांगलादेशला १९२ धावांनी हरवले, दोन कसोटी मालिकेतील दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने बांगलादेशचा १९२ धावांनी पराभव केला. बुधवारी चंतागाव मैदानावर झालेल्या सामन्याच्या पाचव्या दिवशी बांगलादेशचा संघ श्रीलंकेने दिलेल्या ५११ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करू शकला नाही आणि ३१८ धावांत सर्वबाद झाला.



श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने पहिल्या डावात ५३१ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशला पहिल्या डावात केवळ १७८ धावा करता आल्या. दुसऱ्या डावात आघाडी घेत श्रीलंकेने ७ बाद १५७ धावांवर डाव घोषित केला आणि बांगलादेशला ५११ धावांचे लक्ष्य दिले. बांगलादेशचा संघ चौथ्या डावात ३१८ धावांत सर्वबाद झाला आणि सामना गमावला. यासह श्रीलंकेने बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत २-० असा क्लीन स्वीप केला. श्रीलंकेने पहिला सामना ३२८ धावांनी जिंकला होता.२५ वर्षीय अष्टपैलू कमिंडू मेंडिस श्रीलंकेचा सामनावीर ठरला. त्याने पहिल्या डावात नाबाद ९२ धावा केल्या. त्याचबरोबर दुसऱ्या डावात त्याने ३ बळी घेतले.

बांगलादेशने दुसऱ्या डावात शानदार फलंदाजी करत ३१८ धावा केल्या. मात्र संघाला लक्ष्याचा पाठलाग करता आला नाही. सलामीवीर चालले नाहीत, पण मधल्या फळीतील मोमिनुल हक ५० धावा करून बाद झाला आणि शाकिब अल हसन ३६ धावा करून बाद झाला. तर मेहदी हसन मिराजने ८१ धावांची नाबाद खेळी केली. श्रीलंकेकडून वेगवान गोलंदाज लाहिरू कुमाराने ४ बळी घेतले. तर कमिंदू मेंडिसने ३ बळी घेतले. प्रभात जयसूर्याने २ आणि विश्वा फर्नांडोने १ बळी मिळवला.

श्रीलंकेचा संघ दुसऱ्या डावात केवळ १५७ धावा करू शकला. या धावसंख्येवर ७ विकेट्स गमावून संघाने डाव घोषित केला. अँजेलो मॅथ्यूजने एकमेव अर्धशतक झळकावले, त्याने ५६ धावांची खेळी खेळली. बांगलादेशकडून हसन महमुतने ४ बळी घेतले. तर खालेद अहमदने २ आणि शाकिबने १ बळी घेतला. श्रीलंकेसाठी पहिल्या डावात ६ फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. एकाही खेळाडूला शतक झळकावता आले नाही. सलामीवीर निशान मदुशंकाने ५७ धावा, दिमुथ करुणारत्नेने ८६ धावा आणि कुसल मेंडिसने ९३ धावा केल्या. दिनेश चंडिमल ५९ धावा करून बाद झाला, कर्णधार धनंजय डी सिल्वा ७० धावा करून बाद झाला. तर कमिंडू मेंडिस ९२ धावा करून नाबाद राहिला. बांगलादेशकडून शाकिब अल हसनने ३ बळी घेतले. तर हसन महमूदने २ आणि खालिद अहमदने १ बळी घेतला.

बांगलादेशकडून पहिल्या डावात एकही फलंदाज चालला नाही. सलामीवीर झाकीर हसनच्या बॅटमधून एकमेव अर्धशतक झळकले. त्याने ५४ धावांची खेळी खेळली. संघ १७८ धावांवर सर्वबाद झाला. श्रीलंकेला फॉलोऑनची संधी होती, जी त्यांनी निवडली नाही आणि नंतर दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरली. श्रीलंकेकडून पहिल्या डावात असिथा फर्नांडोने ४ बळी घेतले. तर, विश्व फर्नांडो, लाहिरू कुमारा आणि प्रभात जयसूर्याने २-२ बळी घेतले.

## मांडवा येथील जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

# मातृछाया कुर्डूस विजेता तर मरीदेवी धेरंड उपविजेता

**। खारेपाट । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील टाकादेवी स्पोर्ट क्लब मांडवा व ग्रामस्थ मांडवा आयोजित रायगड जिल्हास्तरीय पुरुषांच्या भव्य कबड्डी स्पर्धेत मातृछाया संघ कुर्डूस स्वर्गीय रुची पाटील स्मृती चषक २०२४चा विजेता ठरला. मरीदेवी धेरंड संघाने द्वितीय, श्री गणेश दिवलांग तृतीय तर चतुर्थ क्रमांक नवतरुण करावी संघाने पटकावला. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई पार्थ ठाकूर दिवलांग व उत्कृष्ट पकड रोहित मोकल करावी व पब्लिक हिरो ऋतिक पाटील मरी देवी संघ तसेच स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू समाधान मोरे ठरला.



कुर्डूस क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे व पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सदर स्पर्धा टाकादेवी क्रीडानगरीच्या भव्य मैदानात पार पडली. प्रेक्षकांसाठी भव्य गॅलरी व मान्यवरांसाठी मोठं व्यासपीठ निर्माण करण्यात आले होते. सदर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा रायगड जिल्हा असोसिएशनच्या मान्यतेने मोठ्या दिमाखात संपन्न झाल्या. स्पर्धेचा शुभारंभ रणजीत राणे यांच्या हस्ते करण्यात आला. रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत जिल्ह्यातील ३२ नामवंत संघ सहभागी झाले होते. सदर स्पर्धेच्या वेळी जिल्हा राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या खेळाडूंचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन करण्यात आला. स्पर्धेचे समालोचन अंकुर घरत यांनी केले.

## युवा कबड्डी सिरीज स्पर्धा

# रायगड संघाची गुणतालिकेत पहिल्या स्थानावर झेप

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

मंगळवारी दुसरा सामना रायगड विरुद्ध लातूर यांच्यात झाला. रायगड संघाने प्ले-ऑफ मधील आपले स्थान निश्चित केले होते त्यामुळे त्यांच्या दृष्टीने हा सामना जास्त गुणांनी जिंकत गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर येण्याचा मानस होता.

लातूर संघाचे स्पर्धेतील आव्हान आधीच संपुष्टात आले होते. सामन्याच्या सुरुवातीला सामना अत्यंत संथ सुरू होता. ५ मिनिटाच्या खेळानंतर सामना २-२ असा बरोबरीत होता. त्यानंतर रायगडच्या प्रशांत चव्हाणने चपळाईने गुण मिळवले.



रायगड संघाने १२ व्या मिनिटाला लातूर संघाला ऑल आऊट करत १२-०४ अशी आघाडी मिळवली.

प्रशांत जाधवला अनुराग सिंगने चांगली साथ देत चढाईत गुण मिळवले. बचवाफळीत विराज पाटीलने उत्कृष्ट पकडी केल्या. रायगड संघाने मध्यंतराला १९-०८ अशी आघाडी मिळवली. मध्यंतरा सुद्धा रायगड संघाने आक्रमकता दाखवत लातूर संघाला ऑल आऊट केले. रायगडकडून प्रशांत जाधव व अनुराग सिंग यांनी सुपर टेन पूर्ण केले.

रायगड संघाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व प्रस्थापित करत सामना ५६-२१ असा मोठा विजय मिळवला. रायगड कडून अनुराग सिंग ने चढाईत सर्वाधिक १९ गुण मिळवले. तर प्रशांत जाधवने चढाईत ११ गुण मिळवले. विराज पाटीलने पकडीत ६ गुण तर वैभव मोरेने पकडीत ५ गुण मिळवले.

लातूरकडून आदित्य भारडेने सर्वाधिक ९ गुण मिळवले. विजयानंतर रायगड संघ पहिल्या क्रमांकावर आहे. नाशिक संघाला गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी आजचा शेवटचा सामना २९ गुणांनी जिंकवा लागेल.

# श्रीमई, श्रीजा, शरण्याची आगेकूच

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना (पीएमडीटीए) आयोजित पीएमडीटीए मानांकन ओम दळवी स्मृती टेनिस स्कूल करंडक बारा व चौदा वर्षाखालील गटाच्या ब्रॉन्झ सिरिज टेनिस स्पर्धेत मुलींच्या गटात श्रीमई संतोष, श्रीजा कलशेट्टी, शरण्या सावंत तर मुलांच्या गटात आदित्य उपाध्ये, विआन पेंडुरकरने मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का दिला.

औंध, परिहार चौक येथील महाराष्ट्र पोलिस टेनिस जिमखाना टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत बारा वर्षांखालील मुलींच्या गटात बिगरमानांकित श्रीमई संतोषने पाचव्या मानांकित गौरी बगाडेचा ६-४ असा, चौथ्या मानांकित श्रीजा कलशेट्टीने तनया साठेचा ६-१ असा, अव्वल मानांकित वाण्या अगरवाल व दुसऱ्या मानांकित शरण्या सावंतने आराध्या राठी व सर्वज्ञा जगतापचा ६-० अशा फरकाने तर तिसऱ्या मानांकित सान्वी गोसावीने आराध्या मेंडकेपाटीलचा टायब्रेकमध्ये ६-५(१) असा पराभव केला.

मुलांच्या गटात अव्वल मानांकित आर्यन बॅनर्जीने राजदीप नगरकरवर ६-२ असा, आदित्य उपाध्येने पाचव्या मानांकित आदित्य शहावर ६-४ असा, विआन पेंडुरकरने आठव्या मानांकित विवान डिक्करवर ६-२ असा तर दुसऱ्या मानांकित अहान भट्टाचार्यने कुमार कौटिल्यवर ६-० असा विजय मिळविला.

## ३३वी किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राच्या मुली उप उपांत्यपूर्व फेरीत गारद

**। मुंबई। वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राच्या मुलींचे आव्हान उप उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आले. हरियाणा, गोवा, उत्तराखंड, राजस्थान उपांत्य फेरीत धडक दिली. हरियाणा विरुद्ध गोवा, तर उत्तराखंड विरुद्ध राजस्थान अशा उपांत्य लढती होतील. पटणा येथील पाटली पुत्र क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या ३३व्या किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राला उप उपांत्यपूर्व फेरीतच उत्तर प्रदेशने ५९-२८ असे लीलया नमवित आपली घोडदौड सुरू ठेवली.



महाराष्ट्राने सुरुवात तर झोकात केली. महाराष्ट्राची कप्तान बिंदिसा सोनारने सामन्याच्या पहिल्याच चढाईत बोनस गुण घेत खाते खोलले. काही वेळातच ५गुणांची आघाडी देखील घेतली. पण ती त्यांना टिकविता आली नाही. या पिछाडीवरून खचून न जाता उत्तर प्रदर्शने आपला खेळ गतिमान करीत महाराष्ट्रावर पहिला लोण देत १५-१३ अशी नाममात्र आघाडी घेतली.

पुन्हा खेळाची गती कायम राखत दुसरा लोण देत यू.पी. ने आपली आघाडी २५-१७ अशी वाढविली. विश्रांतीला २६-१७ अशी यू.पी. कडे आघाडी होती. उत्तरार्धात देखील खेळाचा जोश कायम राखत आणखी तीन लोण महाराष्ट्रावर देत उत्तर प्रदेशने गुणांचे अर्धशतक पार केले. पहिली ५ मिनिटे वगळता पूर्ण डावात महाराष्ट्राचा प्रतिकार जाणवला नाही. पहिला लोण घेतल्यानंतर महाराष्ट्र संघाचा संयम सुटला. त्यांनी झटपट गुण मिळविण्याच्या नादात गुण गमविले. गुणांची पिछाडी वाढत गेल्याने ते गांगरूण गेले. उत्तर प्रदेशच्या ज्योती व हिमांशी यांना रोखणे महाराष्ट्राला कठीण जात होते. तर उत्तर प्रदेशचा बचाव भेदने महाराष्ट्राला कठीण जात होते. त्यामुळेच महाराष्ट्राला मोठ्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागला. सुरुवातीला बिंदीसा सोनार, मोनिका पवार यांनी चांगली चमक दाखविली. नंतर मात्र त्या ढेपाळल्या. रात्री उशीरा झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात हरियाणाने पंजाबला ६४-१९ असे, गोव्याने उत्तर प्रदेशला ५१-३३ असे, राजस्थानने छत्तीसगडला ४९-१५ असे, तर उत्तराखंडने तामिळनाडूला ४१-४० असे पराभूत करीत उपांत्य फेरी गाठली.

# जोकोविचचे टेनिस कोर्टवर वर्चस्व!

## फेडररचा विश्वविक्रमही मोडणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सार्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविच आजकाल जेव्हाही मैदानात उतरतो, तेव्हा काही ना काही विक्रम करत असतो. तो आता येत्या आठवड्यातच मोठ्या विश्वविक्रमाला गवसणी घालणार आहे. तो रविवारी (७ एप्रिल) रोजी जागतिक क्रमवारीत एकेरीमध्ये अव्वल क्रमांक मिळणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरणार आहे. तो त्यावेळी ३६ वर्षे आणि ३२१ दिवसाचा असेल.



जोकोविच पहिल्या क्रमांकावर ४१९ आठवडे देखील पूर्ण करेल. तो सर्वाधिक आठवडे क्रमांक एकवर राहाणारा टेनिसपटूही आहे.

या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या रॉजर फेडररपेक्षा तो १०९ आठवडे अधिक काळ पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. फेडरर ३१० आठवडे जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर होता. तसेच स्टेफी ग्राफ ३७७ आठवडे अव्वल क्रमांकावर होती.त्याने ३१ एटीपी टूर विजेतीपदं मिळवली, यात १२ ग्रँडस्लॅम विजेतेपदांचा समावेश आहे. तसेच १० एटीपी मास्टर्स १००० स्पर्धांमधील विजेतेपदांचा समावेश आहे.जोकोविचने त्याच्या संपूर्ण कारकिर्दीत आत्तापर्यंत २४ ग्रँडस्लॅम जिंकले आहेत, तसेच ४० एटीपी मास्टर्स १००० स्पर्धांचे विजेतेपद जिंकले आहेत.जोकोविच सर्वात आधी जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर ४ जुलै २०११ रोजी आला होता. त्यावेळी तो २४ वर्षांचा होता.

# भारतीय बुद्धिबळपटू सज्ज; टोरंटो, कॅनडात स्पर्धेला सुरुवात

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

जगभरातील बुद्धिबळप्रेमींचे लक्ष लागलेल्या प्रतिष्ठेच्या कॅन्डिडेट्स म्हणजेच आव्हानवीरांच्या स्पर्धेला आज, बुधवारपासून टोरंटो, कॅनडा येथे प्रारंभ होणार आहे. यंदा खुल्या विभागात तीन, तर महिला विभागात दोन असे एकूण पाच भारतीय ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू 'कॅन्डिडेट्स' मध्ये खेळताना दिसतील.

या स्पर्धेतील विजेत्या बुद्धिबळपटूला जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीत सध्याच्या जगज्जेत्याला आव्हान देण्याची संधी मिळेल.



पाच वेळच्या जगज्जेत्या विश्वनाथन आनंदने तीन दशकांहूनही अधिक काळ भारतीय बुद्धिबळाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. त्याच्यामुळे भारतीय बुद्धिबळाला वेगळी ओळख मिळाली. परंतु त्याच्या आधी किंवा नंतर भारताचा एकही बुद्धिबळपटू 'कॅन्डिडेट्स'साठी पात्र ठरू शकला नव्हता. यंदा मात्र हे चित्र पूर्णपणे बदलले. आता पुरुष विभागात आर. प्रज्ञानंद, विदित गुजराथी आणि डी. गुकेश, तर महिलामध्ये आर. वैशाली आणि कोनेरू हम्पी असे विक्रमी पाच भारतीय बुद्धिबळपटू कॅन्डिडेट्ससाठी पात्र ठरले आहेत. त्यामुळे भारताला बुद्धिबळातील नवी महासत्ता म्हणून संबोधले जात आहे.

विदित (वय २९ वर्षे) आणि हम्पी (३७ वर्षे) बऱ्याच काळापासून यशस्वी कामगिरी करत असले, तरी त्यांना कारकीर्दीत प्रथमच 'कॅन्डिडेट्स'साठी पात्र ठरण्यात यश आले आहे.




# डेक्कन, अध्यक्षीयचा पहिल्या डावावर विजय

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र क्रिकेट संघटना (एमसीए) आयोजित वरिष्ठ गट सुपर लीग क्रिकेट स्पर्धेत डेक्कन जिमखाना क्लब आणि एमसीए अध्यक्षीय संघाने अनिर्णित सामन्यात पहिल्या डावाच्या आधिक्यावर विजय प्राप्त केले. डेक्कन जिमखाना क्लब मैदानावरील दोन दिवसीय सामन्यात डेक्कन जिमखाना क्लबने सहारा संघाचा अनिर्णित सामन्यात पहिल्या डावाच्या आधिक्यावर विजय मिळविला. त्यात महत्त्वाचा वाटा धीरज फटांगरेने केलेल्या नाबाद द्विशतकाचा होता. या सामन्यात सहारा संघाने प्रथम फलंदाजी करताना ३४० धावा केल्या.




यावेळी अवधूत दांडेकरचे शतक चार धावांनी हुकले त्याने आठ चौकार व एक षटकारासह ९४ धावा, रोहित काकडेने सात चौकार व तीन षटकारासह ७५ धावा, तर आतिष वरपेने दहा चौकारासह ६१ धावा केल्या त्यांना पीयूष अष्टेकरने ४२ धावा करून सुरेख साथ दिली. यश बोरामणीने पाच तर दीपक डांगीने तान गडी बाद केले. प्रत्यूत्तर देताना डेक्कन जिमखाना क्लबने तीन बाद ३५६ धावा करून पहिल्या डावात महत्त्वपूर्ण आघाडी मिळवली. त्यात महत्त्वाचा वाटा सलामीचा फलंदाज धीरज फटांगरेने केलेल्या नाबाद द्विशतकाचा होता त्याने २१ चौकार व तीन षटकारासह २०० धावांची खेळी केली त्याला यश क्षीरसागरने दहा चौकारासह ९७ धावांची खेळी करत सुरेख साथ दिली. यश क्षीरसागरचे शतक तीन धावांनी हुकले.

धीरज फटांगरेने प्रथम देवराज बेडारेच्या साथीत दुसऱ्या गड्याकरिता ४२ धावांची तर यश क्षीरसागरच्या साथीत तिसऱ्या गड्याकरिता २४९ धावांची भागीदारी केली. गहुंजे येथील एमसीएच्या मैदानावर झालेल्या दुसऱ्या लढतीत एमसीए अध्यक्षीय संघाने अनिर्णित सामन्यात छत्रपती संभाजीनगर संघाचा पहिल्या डावाच्या आधिक्यावर पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना एमसीए अध्यक्षीय संघाने नऊ बाद ३९० धावा केल्या त्यात महत्त्वाचा वाटा साहिल औताडेने केलेल्या नाबाद शतकाचा होता त्याने तेरा चौकार व दोन षटकारांसह नाबाद १०४ धावांची खेळी केली त्याला साहिल पारखने बारा चौकार व दोन षटकारासह ७८ धावांची, यासिर शेखने आठ चौकारासह ६८ धावांची खेळी करून सुरेख साथ दिली. स्वप्नील चव्हाण, योगेश चव्हाण, आनंद ठेंगेने प्रत्येकी दोन गडी बाद केले. यावेळी यासीर शेखने प्रथम साहिल पारखच्या साथीत दुसऱ्या गड्याकरिता १०८ धावांची तर हृषीकेश सोनावणेच्या साथीत तिसऱ्या विकेटकरिता ५५ धावांची भागीदारी केली.

प्रत्यूत्तर देताना छत्रपती संभाजीनगर संघाचा डाव २५४ धावांत आटोपला यावेळी आदर्श जैनने चौदा चौकारांसह ८१ धावांची, सूरज गोंडने सात चौकारासह ५६ धावांची तर स्वप्नील चव्हाणने दहा चौकारासह ५२ धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला. हृषीकेश सोनावणेने तीन तर स्नेहल खामणकरने दोन गडी बाद केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)